नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २७७ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...



### हडपसर-हरंगूळ, नांदेड एक्स्प्रेसचे तीन डबे वाढणार

पुणे (स. गांवकरी) : दक्षिण मध्य रेल्वेने प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता पुण्याहून धावणाऱ्या तीन महत्त्वाच्या रेल्वे गाड्यांना कायमस्वरूपी तीन डबे वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. यात हडपसर-हरंगूळ, हडपसर-नांदेडसह नांदेड-पनवेल एक्स्प्रेसचा समावेश आहे. या तीन रेल्वेला प्रत्येकी तीन डबे वाढणार असल्याने मराठवाड्यात जाणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून, तिकिटांच्या वेटिंगचे (प्रतीक्षा यादी) प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. प्रत्येकी तीन डबे वाढणार असल्याने या तिन्ही गाड्या २० डब्यांचे होणार आहेत.

### भाजप कार्यकर्त्यांची जेवणासाठी हाणामारी

भंडारा (स. गांवकरी) : भंडारा जिल्ह्यातील मोहाडी येथे भाजपच्या संघटनात्मक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीनंतर जेवणावरून कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाल्याची घटना घडलीय. दोन गट एकमेकांना भिडल्यानं घडलेल्या या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. मोहाडी येथे भंडारा-गोंदिया जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आणि भाजप आमदार परिणय फुके यांच्या अध्यक्षतेखाली पक्षाची संघटनात्मक बैठक आयोजित करण्यात आली होती. भाजपच्या संघटनात्मक बैठकीला भंडारा जिल्ह्यातील भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### चोरट्यांचा डल्ला

निरगुडसर (स. गांवकरी) : कृषीपंपांच्या केबलवर चोरीमुळे शेतकरी हैराण झाला असून, आंबेगाव तालुक्यातील वळती-नागापूर येथील मीना नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यालगत २० शेतकऱ्यांच्या शेती सिंचनासाठी बसवलेल्या कृषीपंपांच्या केबल अज्ञात चोरट्यांनी कापून लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, शेतीसाठी पाणी पुरवठा ठप्प होऊन एक लाख रुपयांहून अधिक नुकसान झाल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

# नाशिकमध्ये शिवसेनेचा नवा प्लॅन

## तालुकाप्रमुखांना १५ आलिशान गाड्या, राज्यात कधी?

नाशिक : (स. गांवकरी)

शिवसेना (एकनाथ शिंदे) घराघरापर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने पक्षाच्या वतीने नाशिक जिल्ह्यातील तालुकाप्रमुखांना जवळपास १५ 'बोलेरो निओ' या आलिशान गाड्या दिमतीला दिल्या जाणार आहेत. तब्बल १२ ते १३ लाख रुपये इतकी एका बोलेरो निओची किंमत आहे. या मोटारींच्या माध्यमातून शिवसेनेचे जोरदार ब्रँडिंग केले जाणार आहे. नाशिक जिल्हा परिषद निवडणुकीचे पडघम वाजत असताना शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटासह भाजपच्या प्रभाव क्षेत्रात पूर्ण ताकदीने उतरण्याच्या तयारीला लागली आहे. शिवसेनेचे प्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मुंबई येथे नाशिक जिल्ह्यातील तालुकाप्रमुखांना बोलेरो निओचे वाटप करण्याची तयारी सुरू आहे. २६ सप्टेंबरला हा कार्यक्रम आयोजित करण्याबाबत चर्चा सुरू आहे. २५ सप्टेंबरला गणेश विसर्जन असल्यामुळे दुसऱ्या दिवशी होणाऱ्या या कार्यक्रमाची वेळ लवकरच निश्चित होईल, असे शिवसेना सचिव भाऊ चौधरी यांनी सांगितले. नांदगावचे आमदार सुहास कांदे यांच्याकडे नाशिक जिल्हा संघटनाप्रमुखपदाची जबाबदारी आहे. पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी त्यांनी ही संकल्पना मांडल्याचे सांगितले जाते.

ग्रामीण भागाचा विचार करता नांदगाव व मालेगाव बाह्य हे दोन विधानसभा मतदारसंघ शिवसेनेकडे (शिंदे गट) आहेत. सात मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या ताब्यात आहेत. उर्वरित चांदवड-देवळा आणि बागलाण हे ग्रामीण भागातील दोन मतदारसंघ भाजपकडे आहेत. ग्रामीण भागात राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचा प्रभाव असून आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या निमित्ताने अजित पवार गटासह भाजपला शह देण्याची तयारी शिवसेना करीत आहे.




गावोगावी पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी प्रत्येक तालुकाप्रमुखास बोलेरो निओ वाहन उपलब्ध करून दिले जाणार आहे. संबंधितांना वाहने देण्यापूर्वी पक्ष संघटना वाढविण्याबाबत प्रशिक्षणही देण्यात आले आहे. तालुकाप्रमुखांकडून या मोटारींची दैनंदिन भ्रमंती आणि कामाचा अहवाल घेतला जाणार आहे. आमदार सुहास कांदे यांच्या संकल्पनेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही दाद दिल्याचे सांगितले जाते. शिवसेना संघटना बांधणीच्या दृष्टीने नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक तालुकाप्रमुखाला एक याप्रमाणे बोलेरो निओ मोटार दिली जाणार असल्याचे शिवसेना सचिव भाऊ चौधरी यांनी सांगितले. काही वर्षांपूर्वी भाजपने आपल्या जिल्हाध्यक्षांना मोटारी दिल्या होत्या. त्याच धर्तीवर शिवसेनेने आता १५ तालुकाप्रमुखांना प्रत्येकी १२ ते १३ लाख रुपयांची आलिशान मोटार देऊन संघटना मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

### मोटारीतून गावोगावी ब्रँडिंग

जिल्हा परिषद गट, पंचायत समिती गण आणि गावोगावी फिरून संघटना बांधणी करणे सोपे व्हावे, हा प्रत्येक तालुकाप्रमुखाला बोलेरो निओ देण्यामागील उद्देश आहे. या मोटारींच्या माध्यमातून शिवसेनेचे ब्रँडिंग केले जाणार आहे. शिवसेना संघटना घराघरापर्यंत पोहोचवणे आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवून योग्य लाभार्थ्यांना त्याचा लाभ मिळवून देणे, हा यामागील उद्देश आहे. हा प्रकल्प सध्या नाशिकमध्ये सुरू करण्यात येत असून पुढे संपूर्ण महाराष्ट्रात तो राबविला जाईल, असे पक्षाचे सचिव भाऊ चौधरी यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना सांगितले.

## पुणे, पिंपरीत ११ हजार रिक्षांचे प्रमाणीकरण; आजपासून कामकाज सुरू

पुणे : (स. गांवकरी)

पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये रिक्षा भाडेवाढ लागू झाल्यानंतर आतापर्यंत एकूण ११ हजार रिक्षांचे मीटर प्रमाणीकरण (कॅलिब्रेशन) पूर्ण झाले आहे. रिक्षाचालकांच्या सोयीसाठी पुणे आरटीओने मीटर तपासणी केंद्रांच्या संख्येत वाढ केली असून, मंगळवारपासून (ता. २२) नवीन केंद्रे कार्यान्वित होत आहेत. पुणे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने तीन ऑगस्टच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार, एक सप्टेंबर २०२६ पासून सुधारित भाडेवाढ लागू झाली आहे. यानंतर मीटर तपासणी अनिवार्य असल्याने आरटीओने शिवाजीनगर व रामटेकडी येथे दोन नवीन केंद्रे सुरू केली आहेत. पुण्यात आतापर्यंत



आठ हजार, तर पिंपरी-चिंचवडमध्ये तीन हजार रिक्षांचे प्रमाणीकरण झाले आहे. दीड लाख रिक्षांची संख्या लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला आहे.

**येथे होणार मीटर तपासणी**

अलंकार पोलिस ठाण्यासमोर, कर्वेनगर
इऑन आयटी पार्कजवळ, खराडी
पोलिस चौकीसमोर, खराडी
सिंचननगर, रेंजहिल्स कॉर्नर, शिवाजीनगर
रामटेकडी इंडस्ट्रियल इस्टेट, इगलबर्ग कंपनी, लेन क्रमांक ३, रामटेकडी

## प्रमुख वृत्त वाहिन्यांनी 'व्हाईट हाऊस'च्या बातम्यांचं प्रसारण थांबवलं

### डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा धक्का

मुंबई : (स. गांवकरी)

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे कायम कोणत्या न कोणत्या कारणांनी चर्चेत असतात. इराण युद्ध, वादग्रस्त इमिग्रेशन, H-1B व्हिसा, आयात शुल्क अशा अनेक मुद्द्यांवर डोनाल्ड ट्रम्प हे दररोज वेगवेगळी वक्तव्य करत असतात. या घडामोडी सुरू असतानाच डोनाल्ड ट्रम्प यांनी अचानक प्रसारमाध्यमांविरोधात आक्रमक भूमिका घेतल्याचं पाहायला मिळालं होतं. अमेरिकेतील आघाडीच्या आणि जगप्रसिद्ध 'सीएनएन' (CNN), 'एमएस नाऊ' आणि 'पॉलिटिको' या वृत्तसंस्थांना डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमधून थेट बाहेरचा रस्ता दाखवला. डोनाल्ड ट्रम्प यांनी या वृत्तसंस्थांवर एकांगी वार्तांकन आणि 'फेक न्यूज' पसरवल्याचा गंभीर आरोप केला होता. त्यामुळे या वृत्तसंस्थांना 'व्हाईट हाऊस'मध्ये बंदी घालण्यात आल्याचं त्यांनी म्हटलं होतं.

दरम्यान, आता डोनाल्ड ट्रम्प यांचा हा निर्णय त्यांच्याच अंगलट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कारण अमेरिकेतील प्रमुख वृत्त वाहिन्यांनी, टीव्ही नेटवर्कनी व्हाईट हाऊस आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या बातम्यांचं प्रसारण तात्काळ थांबवलं आहे. त्यामुळे अमेरिकेत खळबळ उडाली असून या वादाची चांगलीच चर्चा सुरू झाली आहे. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे. दरम्यान,



अमेरिकेतील आघाडीच्या 'सीएनएन', 'एमएस नाऊ' आणि 'पॉलिटिको' या वृत्तसंस्थांना व्हाईट हाऊसने प्रवेश नाकारल्यानंतर अमेरिकेतील इतर प्रमुख वृत्त वाहिन्यांनी 'व्हाईट हाऊस'च्या आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या बातम्यांचं प्रसारण थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. एवढंच नाही तर ज्या वृत्तसंस्थांना व्हाईट हाऊसमध्ये बंदी घालण्यात आली, त्या वृत्तसंस्थांनी ट्रम्प प्रशासनाविरुद्ध थेट खटला दाखल करण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे आता डोनाल्ड ट्रम्प आणि प्रसारमाध्यमांमधील वाद चव्हाट्यावर आला आहे. ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहून वृत्तसंस्थांवर जोरदार हल्लाबोल केला होता. देशात प्रामाणिक आणि सत्य वार्तांकन झालं पाहिजे, असा दावा ट्रम्प यांनी केला होता. जर इतर माध्यमांनी आपली भूमिका बदलली नाही, तर त्यांच्यावरही अशीच कारवाई केली जाईल, असा इशारा ट्रम्प यांनी दिला होता.

"मला हे जाहीर करताना अभिमान वाटतो की, सातत्याने खोट्या बातम्या देणाऱ्या सीएनएन, पॉलिटिको या संस्थांवर व्हाईट हाऊसमधून तात्काळ बंदी घातली जात आहे. ट्रम्प प्रशासन किंवा अमेरिकेबद्दल वृत्त देताना माध्यमांना कपोलकल्पित गोष्टी आणि खोटी माहिती पसरवण्याचा अधिकार नाही", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं होतं.

## शिक्षक भरती प्रक्रियेतील रुपांतरित फेरीची निवडयादी जाहीर

पुणे : (स. गांवकरी)

पवित्र प्रणालीद्वारे राबवण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेतील रुपांतरित फेरीतून ४ हजार ३९० उमेदवारांची मुलाखतीशिवाय निवड प्रकारात शिफारस करण्यात आली आहे. शिफारस झालेल्या उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली असून, या उमेदवारांची २४ ते २८ सप्टेंबर या कालावधीत कागदपत्र पडताळणी करून ९ ऑक्टोबरपर्यंत पदस्थापना देण्यात येणार आहे. शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी या या बाबतची माहिती दिली. राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त डॉ. नंदकुमार बेडसे,



राज्य मंडळाचे अध्यक्ष डॉ. त्रिगुण कुलकर्णी, राजेश शिंदे या वेळी उपस्थित होते. शिक्षक भरतीअंतर्गत अलीकडेच मुलाखतीविना निवड प्रकारात १३ हजार ११९ उमेदवारांची शिफारस करण्यात आली होती. त्यावेळी समांतर आरक्षण, राखीव प्रवर्गातील ६ हजार ६३५ पदांवर उमेदवार न मिळाल्याने ती पदे रिक्त राहिली होती. त्यापैकी समांतर आरक्षणातील पदांसाठी रुपांतरित फेरी राबवण्याचा प्रस्ताव शासनाला पाठवण्यात आला होता. या प्रस्तावाला शासनाने मंजुरी दिल्यानंतर रुपांतरित फेरीतून पात्र ठरलेल्या ४३९० उमेदवारांची शिफारस करण्यात आली. आता २ हजार २४५ पदे रिक्त राहिली आहेत. शिक्षण आयुक्त सिंह म्हणाले, शिक्षक भरतीमध्ये मुलाखतीविना निवड प्रकारात शिफारस केलेल्या १३११९ उमेदवारांपैकी आतापर्यंत १८३० उमेदवार रूजू झाले आहेत. किती उमेदवार रूजू होतात याचे चित्र १० ऑक्टोबरपर्यंत स्पष्ट होईल.






महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
## संपादकीय

# पुरंदरच्या राजकारणात महिलांची वाढती पावले

**पुरंदरच्या राजकारणात गेल्या काही काळात एक बदल प्रकर्षाने जाणवू लागला आहे. सार्वजनिक कार्यक्रम असो, महिला मेळावा असो, आरोग्य शिबिर असो किंवा नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठीची भेट असो—महिला नेतृत्वाचा सहभाग आता अधिक ठळकपणे दिसू लागला आहे. हा बदल केवळ काही व्यक्तींच्या राजकीय सक्रियतेपुरता मर्यादित न राहता स्थानिक राजकारणाच्या बदलत्या स्वरूपाचे संकेत देणारा ठरू शकतो.**

राजकारणात महिलांचा सहभाग हा केवळ निवडणुकीतील उमेदवारीपुरता मर्यादित विषय नाही. गावपातळीपासून जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि त्यापुढील राजकीय प्रक्रियेत महिलांना मिळणारे प्रतिनिधित्व ही लोकशाही अधिक व्यापक करणारी बाब आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणामुळे अनेक महिलांना सार्वजनिक जीवनात येण्याची संधी मिळाली. त्यातून अनेक महिला प्रश्न मांडू लागल्या, नागरिकांशी संवाद साधू लागल्या आणि निर्णय प्रक्रियेचा भाग बनल्या.

पुरंदरमध्ये सध्या विविध राजकीय कुटुंबांशी संबंधित महिला तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधून पुढे आलेल्या महिला सार्वजनिक क्षेत्रात सक्रिय दिसत आहेत. त्यांच्या उपक्रमांकडे राजकीय चष्म्यातून पाहिले जाणे स्वाभाविक असले, तरी त्यांच्या प्रत्येक सामाजिक उपक्रमाचा थेट अर्थ आगामी विधानसभा उमेदवारी असा लावणे योग्य ठरणार नाही. राजकारणात जनसंपर्क वाढविणे, सामाजिक काम करणे आणि निवडणूक लढविणे या तीन वेगवेगळ्या प्रक्रिया आहेत. मात्र, या सक्रियतेमुळे एक महत्त्वाचा प्रश्न निश्चितच उपस्थित होतो—पुरंदरच्या राजकारणात महिलांना निर्णय प्रक्रियेत प्रत्यक्ष किती स्थान मिळणार?

महिलांना व्यासपीठावर स्थान देणे आणि त्यांना प्रत्यक्ष निर्णयक्षम भूमिका देणे यात मोठा फरक आहे. महिला मेळावे घेणे, कार्यक्रमांचे उद्घाटन करणे किंवा सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होणे यापलीकडे जाऊन स्थानिक विकासाच्या प्रश्नांवर महिलांचे स्वतंत्र मत ऐकले गेले पाहिजे. पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, महिला सुरक्षा, रोजगार, शेती आणि ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा या प्रश्नांवर महिला नेतृत्वाने ठोस भूमिका मांडणे ही काळाची गरज आहे.

पुरंदरसारख्या ग्रामीण आणि वेगाने बदलणाऱ्या भागात महिलांसमोरची आव्हानेही अनेक स्तरांवरची आहेत. गावागावातील पाणीपुरवठा, महिलांसाठी आरोग्य सुविधा, मुलींचे शिक्षण, सुरक्षित सार्वजनिक वाहतूक, रोजगाराच्या संधी आणि स्वयंसहायता गटांना बाजारपेठ मिळवून देणे यांसारखे विषय राजकीय अजेंड्यावर सातत्याने राहणे आवश्यक आहे.

महिला नेतृत्वाचा उदय हा केवळ 'महिला विरुद्ध पुरुष' असा राजकीय संघर्ष नसून लोकशाहीतील प्रतिनिधित्वाचा विस्तार आहे. पुरुष नेतृत्वाने ज्या पद्धतीने राजकारण केले, त्याच चौकटीत महिलांनीही काम करावे, अशी अपेक्षा ठेवण्यापेक्षा महिलांनी स्वतःचे प्रश्न, स्वतःची कार्यपद्धती आणि विकासाचा दृष्टिकोन पुढे आणणे अधिक महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर केवळ राजकीय घराण्यांमधून आलेल्या महिलांनाच संधी मिळू नये, हीदेखील लोकशाहीची अपेक्षा आहे. सामान्य कुटुंबातून, सामाजिक क्षेत्रातून, शिक्षण, शेती, उद्योग, आरोग्य आणि स्वयंसेवी संस्थांमधून काम करणाऱ्या महिलांनाही राजकीय व्यासपीठ मिळाले पाहिजे. महिला नेतृत्वाची खरी ताकद विविध सामाजिक स्तरांतील महिलांना राजकारणात सहभागी करून घेण्यात आहे.

पुरंदर विधानसभा मतदारसंघ महिलांसाठी आरक्षित होणार की नाही, कोणाला उमेदवारी मिळणार, कोणता पक्ष कोणावर विश्वास ठेवणार, याबाबत सध्या तर्क-वितर्क सुरू असले तरी त्यापेक्षा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे महिलांचा राजकीय सहभाग किती टिकाऊ आणि परिणामकारक ठरतो.

राजकारणात महिलांची उपस्थिती वाढणे ही केवळ निवडणुकीपूर्वीची हालचाल ठरू नये. निवडणुका आल्या की सक्रिय होणे आणि त्यानंतर पुन्हा सार्वजनिक जीवनातून दूर जाणे, हा प्रकार बदलला पाहिजे. सातत्यपूर्ण जनसंपर्क, प्रश्नांचा अभ्यास, लोकांच्या अडचणींचे निराकरण आणि विकासकामांमध्ये सहभाग यावर महिला नेतृत्वाची खरी परीक्षा होईल.

पुरंदरच्या राजकारणात महिलांची वाढती सक्रियता त्यामुळे स्वागतार्ह चर्चेचा विषय आहे. मात्र, या चर्चेला व्यक्ती किंवा उमेदवारीपुरते मर्यादित न ठेवता महिला सक्षमीकरण, प्रतिनिधित्व आणि स्थानिक विकासाच्या व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. **महिलांना राजकारणात केवळ स्थान मिळणे पुरेसे नाही; त्यांना निर्णय घेण्याची संधी, स्वतंत्र भूमिका मांडण्याचे स्वातंत्र्य आणि जनतेच्या प्रश्नांवर काम करण्याचे अधिकार मिळणे आवश्यक आहे. पुरंदरच्या राजकारणातील पुढचा अध्याय महिलांच्या या वाढत्या सहभागाला किती अर्थपूर्ण दिशा मिळते, यावरच लिहिला जाणार आहे.**

# थोडक्यात पण महत्वाचे



## दिव्यात विषबाधा सदृश घटना; एकाचा मृत्यू तर दोघे गंभीर

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : दिवा पूर्व येथील सदगुरु नगर भागातील आशापुरा माता को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये आज सकाळी विषबाधेची धक्कादायक घटना घडली. या घटनेत गोविंद गुप्ता (वय २८) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून विशाल जयस्वाल (वय ३५) आणि परवेश जयस्वाल (वय ४०) हे दोघे गंभीर अवस्थेत असून त्यांच्यावर कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, तिघेही सॅन्डविच विक्रीचा व्यवसाय करत असून मूळचे उत्तर प्रदेशातील रहिवासी आहेत. ते राहत्या घरात बेशुद्धावस्थेत आढळून आले. घरातून गॅसचा उग्र वास येत असल्याने ही घटना नागरिकांच्या निदर्शनास आली. त्यानंतर तिघांनाही तातडीने कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान गोविंद गुप्ता यांचा मृत्यू झाला. दरम्यान, विषबाधा नेमकी कशामुळे झाली, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. गॅस गळतीचा संशय व्यक्त करण्यात येत असून घटनास्थळी फॉरेन्सिक लॅबचे कर्मचारी दाखल झाले आहेत. प्रकरणी मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा येथील सहायक पोलीस निरीक्षक अनिल सोनवणे व पोलीस उप निरीक्षक अंबादास सावंत पुढील तपास करत आहे.

## 'जल अर्पण' व 'हर घर जल' गावे घोषित करण्यास वेग

ठाणे (स. गांवकरी) : सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्ह्यातील ग्रामीण भागात शाश्वत पाणीपुरवठा, जलसंधारण आणि प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे नियमित व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'जल अर्पण' व 'हर घर जल' गावे घोषित करण्याची प्रक्रिया वेगाने राबविण्यात येत आहे. अशी माहिती ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर यांनी दिली. 'हर घर जल' संकल्पनेनुसार प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला घरगुती नळ जोडणीद्वारे पुरेसे, सुरक्षित व नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याबरोबरच उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन व संरक्षण करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. गावातील सर्व कुटुंबांना नळजोडणी उपलब्ध असून पाणीपुरवठा नियमित व कार्यक्षम असल्याची खात्री झाल्यानंतर संबंधित गाव 'हर घर जल' म्हणून घोषित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच 'जल अर्पण' उपक्रमांतर्गत जलस्रोतांचे संवर्धन व पुनर्भरण, पाणी बचत, पाण्याचा काटकसरीने वापर आणि जलसुरक्षेबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. गावातील पाणीपुरवठा योजना, जलस्रोत आणि त्यांच्या शाश्वततेबाबत आवश्यक बाबींची पूर्तता करून गावांना जलसमृद्ध व जलसुरक्षित करण्याच्या दिशेने प्रयत्न करण्यात येत आहेत.



## कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आत्महत्येचा प्रयत्न सेवेत कायम करण्याची मागणी

सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर महापालिकेच्या इमारतीवर चढून एका कंत्राटी कर्मचाऱ्यांने आज आत्महत्येचा प्रयत्न केला. सेवेमध्ये कायम करण्याची मागणी करत या कर्मचाऱ्याने सोलापूर महानगरपालिकेच्या इमारती च्या तिसऱ्या मजल्यावर चढून खाली उडी टाकून जीव देण्याचा प्रयत्न केला. परंतु पोलीस आणि अग्निशमन दलाने तात्काळ कारवाई करून या कर्मचाऱ्याला समजावून सांगत खाली उतरविले. सोलापूर महानगरपालिका सोलापूर महापालिकेत वारसा हक्काच्या नोकरीसाठी ऑडिट प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही नियुक्ती रखडल्याचा प्रकार समोर आला आहे. जीडी विभागाच्या दिरंगाईमुळे बुद्धभूषण कांबळे यांनी टोकाचे पाऊल उचलण्याचा प्रयत्न केल्याचे सांगण्यात आले. प्रशासनाने त्यांची समजूत काढून त्यांना सुरक्षित खाली घेतले. यानंतर उपायुक्तांशी चर्चा झाली. शासकीय नियमांनुसार तात्काळ नियुक्तीपत्र देण्याचे आदेश देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# ३० वर्षांपासून दिव्यांग स्टॉलच्या मागणीसाठी पाठपुरावा

- सुरेश दुधाणे यांना अद्याप न्याय नाही!
- उपजीविकेसाठी दुकानाची मागणी
- एका हाताने दिवसभर अगरबत्ती विक्री करून उदरनिर्वाह!

नवी मुंबई : (स. गांवकरी)

दिव्यांग असूनही स्वाभिमानाने व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी धडपडणाऱ्या सुरेश दुधाणे यांना गेल्या सुमारे ३० वर्षांपासून त्यांच्या हक्काच्या दिव्यांग कोट्यातून दुकान किंवा स्टॉल मिळावा, यासाठी प्रशासनाकडे सातत्याने अर्ज व पाठपुरावा करावा लागत आहे. मात्र अनेक वेळा निवेदने आणि अर्ज करूनही अद्याप त्यांच्या मागणीवर ठोस कार्यवाही झालेली नसल्याने त्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त केली आहे. सुरेश दुधाणे हे एका हाताने दिव्यांग असून सध्या अगरबत्ती विक्रीचा व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करीत आहेत. हातात अगरबत्तीची पिशवी घेऊन दिवसभर बाजारपेठेत फिरून अगरबत्ती विकणे त्यांच्यासाठी अत्यंत कष्टाचे झाले आहे. वाढते वय, शारीरिक अडचणी आणि दिवसभर बाजारपेठेत फिरण्याची होणारी कसरत यामुळे स्थिर स्वरूपात व्यवसाय करण्यासाठी दुकान किंवा स्टॉल मिळणे त्यांच्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. दुधाणे यांनी सांगितले की, सन १९९६ पासून दिव्यांग स्टॉल मिळावा, यासाठी प्रशासनाकडे सातत्याने मागणी करण्यात येत आहे. उपजीविकेसाठी स्थिर व्यवसायाचे साधन उपलब्ध करून द्यावे, या मागणीसाठी त्यांनी वेळोवेळी अर्ज साद केले असून संबंधित कार्यालयांकडे पाठपुरावाही केला आहे. मात्र जवळपास तीन दशके उलटूनही त्यांच्या मागणीचा प्रश्न प्रलंबितच आहे. दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी होण्यासाठी शासनाच्या विविध योजना व सवलतींच्या माध्यमातून व्यवसायाची संधी उपलब्ध करून देण्याचे धोरण असताना प्रत्यक्षात एका दिव्यांग व्यक्तीला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आवश्यक असलेली जागा किंवा स्टॉल मिळण्यासाठी एवढा प्रदीर्घ काळ प्रतीक्षा करावी लागत असल्याची खंत दुधाणे यांनी व्यक्त केली.

# विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीत स्त्रीशक्तीचे योगदान मोठे

- उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील
- मोहन डांगरे मित्र परिवारातर्फे तब्बल ८०० अंगणवाडी सेविकांचा साडी देऊन झाला सन्मान



सोलापूर : (स. गांवकरी)

अंगणवाडी सेविकांकडून आणि समाजातील प्रत्येक आईकडून पुढची पिढी घडवण्याचे महान कार्य होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाहिलेल्या 'विकसित भारत २०४७' च्या स्वप्नपूर्तीत स्त्री शक्तीचे योगदान मोठे राहणार आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा शहर उपाध्यक्ष मोहन डांगरे मित्र परिवारातर्फे आयोजित सेवा संकल्प अभियानांतर्गत सोमवारी ८०० अंगणवाडी सेविकांना उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते साडी देऊन सन्मानित करण्याचा सोहळा श्री शिवछत्रपती रंगभवन सभागृहात झाला. याप्रसंगी व्यासपीठावर भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते, भाजपा शहर उपाध्यक्ष आणि संयोजक मोहन डांगरे, सृष्टी डांगरे, महिला बाल विकास प्रकल्प अधिकारी विजय खोमणे, दिपक ढेपे, भाजपा शहर उपाध्यक्ष प्रशांत फत्तेपूरकर उपस्थित होते.

व्याहूर्ती होम करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान झाले तेव्हा देश जगात ११ व्या क्रमांकावर होता. आता तो चौथा क्रमांकावर आहे. २०४७ साली भारताला देशाला जगात पहिल्या क्रमांकावर नेण्याचा संकल्प म्हणजेच विकसित भारताचा संकल्प आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील भारत घडवण्यासाठी आपण सर्वांनी कार्यरत राहूया. महिलेला समाजात मानाचे स्थान मिळावे या हेतूने अंगणवाडी सेविकांना सन्मानित करण्याचा कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. देशात १४२ कोटी लोकसंख्येपैकी ७१ कोटी महिलांची लोकसंख्या आहे. त्यांचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध क्षेत्रात महिलांना संधी दिली आहे. तसेच लखपती दीदी, विद्यार्थिनींसाठीची पोस्टाची योजना, मुख्यमंत्री लाडकी बहीण अशा अनेक योजना त्यांच्या कार्यकाळात आणल्या आहेत. स्त्री सक्षम झाली तर कुटुंब सक्षम होणार आहे, असेही मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. याप्रसंगी ८०० अंगणवाडी सेविकांना साडी देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगेश डांगरे, शुभम चिट्याल, अविनाश शंकू, बाबू चिप्पा, विवेक नक्का, व्यंकटेश बंडा, अंबादास पोगुल, उमेश चिट्याल, लक्ष्मीकांत येलदी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संयोजक आणि भारतीय जनता पार्टीचे शहर उपाध्यक्ष मोहन डांगरे यांनी प्रास्ताविक केले. प्रथमेश कासार यांनी सूत्रसंचालन तर योगेश डांगरे यांनी आभार प्रदर्शन केले.

# जुन्नरमधील कल्याण-लातूर महामार्गाला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध

शिवनेरी : (स. गांवकरी)




जुन्नर तालुक्यातील प्रस्तावित कल्याण–लातूर जनकल्याण महामार्गाला २५ गावांसह वाड्या-वस्त्यांमधील आदिवासी व शेतकरी बांधवांकडून तीव्र विरोध होत आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत आणि आमदार आदित्य ठाकरे श्री गणरायाच्या विसर्जनानंतर जुन्नर तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांची भेट घेणार आहेत, अशी माहिती पुणे जिल्हा सहसंपर्कप्रमुख दिलीप बामणे यांनी दिली. बनकर फाटा येथे कल्याण–लातूर जनकल्याण महामार्ग विरोधी कृती समितीच्या वतीने सुरू असलेल्या धरणे आंदोलनादरम्यान निवेदन स्वीकारताना बामणे यांनी ही माहिती दिली. यावेळी बोलताना दिलीप बामणे म्हणाले, "शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष हा अन्यायाविरुद्ध लढणारा पक्ष आहे. या भागातील बहुतांश शेतकरी अल्पभूधारक असून प्रस्तावित महामार्गामुळे अनेक कुटुंबांवर भूमिहीन होण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे."

घरे, फळबागा आणि सुपीक जमीन बाधित होण्याची भीती

प्रस्तावित महामार्गामुळे मोठ्या प्रमाणावर सुपीक शेतजमीन, फळबागा, घरे, विहिरी, स्मशानभूमी, मंदिरे आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाधित होण्याची शक्यता असल्याचे सामाजिक कार्यकर्त्या मंदाकिनी दांगट यांनी सांगितले.

"येथील अनेक शेतकरी कुटुंबांचा उदरनिर्वाह शेती आणि शेतमजुरीवर अवलंबून आहे. महामार्गासाठी जमीन गेल्यास त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे," अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

विधान भवनावर मोर्चाचा इशारा

महामार्गाच्या प्रस्तावामुळे शेतकऱ्यांमध्ये भीती आणि तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून, जुन्नर तालुक्यात या प्रकल्पाला मोठा विरोध असल्याचे कृती समितीचे कार्याध्यक्ष सुरज वाजगे यांनी सांगितले.

"महाराष्ट्र सरकारने बाधित शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास विरोधी कृती समितीच्या माध्यमातून विधान भवनावर भव्य मोर्चा काढण्यात येईल," असा इशारा वाजगे यांनी दिला.

यावेळी उबाठा गटाचे उपजिल्हाप्रमुख ॲड. जयराम तांबे, उपाध्यक्ष भगवान घोलप, बाजार समिती संचालिका प्रियंका शेळके, सरपंच महेश शेळके, सरपंच स्वप्निल अहिनवे, नितीन घोलप, आशा सस्ते, विशाल सस्ते, नवनाथ सुकाळे, पंकज हांडे आदींनी मनोगत व्यक्त केले.

# कोल्ह्याला शेतकऱ्याने पाणी पाजून दिले जीवदान

अक्कलकोट : (स. गांवकरी)

गेल्या तीन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने अक्कलकोट तालुक्यातील उडगी परिसरातील तलाव-ओढे आटले आहेत. परिणामी, वन्यजीवांची पाण्यासाठी रानोमाळ भटकंती सुरू असून, त्यांच्या जीविताचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शुक्रवारी याच विदारक वास्तवाची प्रचिती आली. उडगी वनक्षेत्रालगतच्या कोरे पाझर तलाव परिसरात पाण्याच्या शोधात व्याकूळ होऊन विव्हळत पडलेल्या कोल्ह्याला शेतकरी भोगप्पा पालदे यांनी पाणी पाजून जीवदान दिले. शुक्रवारी दुपारी दोनच्या सुमारास भोगप्पा पालदे यांना कोल्ह्याच्या विव्हळण्याचा आवाज ऐकू आला. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. पाण्यासाठी व्याकूळ होऊन तडफडणारा कोल्हा दिसताच त्यांनी जवळील पाण्याच्या बाटलीतून त्याला पाणी पाजले. तसेच त्याच्या अंगावरही पाणी ओतले. पाणी मिळताच कोल्ह्याला काहीसा



दिलासा मिळाला आणि तो थोड्या वेळाने तेथून निघून गेला. उडगी वनक्षेत्रातील पाणवठे कोरडे पडल्याने वन्यजीवांना पाण्यासाठी धडपड करावी लागत आहे. वन्यजीवांची ही जीवघेणी भटकंती थांबविण्यासाठी वन विभागाने तातडीने कृत्रिम पाणवठे पाण्याने भरावेत, अशी मागणी वन्यजीवप्रेमींकडून होत आहे. याबाबत अनेक वन्य जीवप्रेमी लोकांनी प्रस्तुत प्रतिनिधी महेश गायकवाड यांच्या शी बोलताना सांगितले की वन विभागाच्या दुर्क्षपणामुळे वन्य जीवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

# नांदेड जिल्ह्यात २१ ते २४ सप्टेंबरदरम्यान 'येलो अलर्ट'

- वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता
- नागरिकांनी सतर्क राहण्याचे आपत्ती व्यवस्थापन विभागाचे आवाहन

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी २१ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या कालावधीत जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात पावसाची शक्यता असून, नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे. २१, २२ व २४ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजांच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे. तसेच २३ सप्टेंबर रोजी तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे, विजांचा कडकडाट व ढगांचा गडगडाट यांसह मुसळधार पाऊस होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक ती खबरदारी व प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. नागरिकांनीही हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करून सुरक्षितता बाळगावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कुन्हे यांनी केले आहे.

# मुखेड तालुक्यातील सलगरा (खु) च्या सुपुत्राची गरिबीवर मात करत MBBS साठी निवड

मुखेड : (स. गांवकरी)



मुखेड तालुक्यातील मौजे सलगरा (खुर्द) येथील रहिवासी पुंडलिक विठ्ठल गोदवाड या विद्यार्थ्याने जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन केले आहे. पुंडलिक याची शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबेजोगाई येथे MBBS अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.

पुंडलिकचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा सलगरा खुर्द येथे झाले असून, पुढील शिक्षण यशवंत महाविद्यालय, नांदेड येथे पूर्ण केले आहे. त्याचे वडील विठ्ठल भारत गोदवाड हे सर्वसामान्य शेतकरी असून अत्यंत गरिबीच्या परिस्थितीतही त्यांनी मुलाला उच्च शिक्षण दिले. मुलाच्या या यशाबद्दल संपूर्ण गावातून त्याचे कौतुक होत आहे.

या यशाबद्दल सामाजिक कार्यकर्ते शेख सुलेमान सलगरकर यांच्या हस्ते पुंडलिक विठ्ठल गोदवाड याचा सत्कार करण्यात आला. यावेळी शेख अल्लाउद्दीन शेख, मौलासाब शेख यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. पुंडलिकच्या या यशामुळे सलगरा (खु) गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी तो एक आदर्श ठरला आहे

# थोडक्यात पण महत्वाचे



## भाजपा अल्पसंख्याक मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी ॲड. माज बडगुजर

किनवट (स. गांवकरी) : भारतीय जनता पक्षाच्या नांदेड जिल्हा अल्पसंख्याक मोर्चाच्या नांदेड उत्तर जिल्हाध्यक्षपदी ॲड. माज बडगुजर यांची नियुक्ती करण्यात आली. माहूर येथे भाजपा नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी भाजपा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, मराठवाडा सहसंपर्कप्रमुख नितीन काळे, आमदार भीमराव केराम, प्रदेश उपाध्यक्ष चैतन्य बापू देशमुख, प्रदेश संयोजक सुधाकर भोयर, सौ संध्या राठोड, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, भाजपा मंडळ अध्यक्ष उमाकांत कराळे पाटील, स्वागत आयनेनीवार, ॲड. नैतिक नाईक, नगरसेवक गोपू महामुने, नगरसेवक संतोष मरसकोल्हे आणि नीलकंठ मस्के उपस्थित होते. अल्पसंख्याक समाजासह सर्व घटकांना पक्षाच्या संघटनेशी जोडून संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणार असल्याचे ॲड माज बडगुजर यांनी सांगितले. नियुक्तीनंतर त्यांनी आमदार भीमराव केराम, ॲड. किशोर देशमुख यांच्यासह उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

## सेवा संकल्प महाअभियानांतर्गत नांदेड महा-आयडीयाथॉन २०२६चे आयोजन

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : पंतप्रधान यांच्या संवैधानिक पदावरील २५ वर्षांच्या सेवा पर्वाच्या औचित्याने राज्यभरात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नांदेड जिल्ह्यातील स्थानिक समस्यांवर कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपाय शोधण्यासाठी 'नांदेड महा-आयडीयाथॉन २०२६'*चे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या शासन निर्णयानुसार, जिल्हास्तरीय महा-आयडीयाथॉनमधील उत्कृष्ट उपायांना राज्यस्तरीय 'महा-नाविन्यता आव्हान' (Maha-Grand Innovation Challenge) मध्ये सादरीकरणाची संधी मिळणार आहे. तसेच निवडक नाविन्यपूर्ण उपायांसाठी शासकीय कार्यादेश आणि उद्योजकता-विकासासाठी आवश्यक मार्गदर्शन व इनक्युबेशन सहाय्य उपलब्ध होणार आहे. या उपक्रमात जिल्ह्यातील विद्यार्थी, युवक, स्टार्टअप्स, आयटीआय व अभियांत्रिकी विद्यार्थी, व्यावसायिक तसेच ग्रामीण नवोन्मेषकांना एक ते पाच सदस्यांच्या संघामध्ये सहभागी होता येईल. सहभागी संघांनी पुढील पाच प्रमुख क्षेत्रांतील स्थानिक समस्यांवर तंत्रज्ञान व एआय आधारित उपाय सादर करावयाचे आहेत.

## प्रस्थापितांचे स्वप्नभंग होणार की आशावादींची आशा प्रबळ होणार?

तामसा (स. गांवकरी) : हदगाव तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत आज होत असल्याने तालुक्यातील ग्रामीण राजकारणाचे वातावरण चांगलेच तापले आहे. तामसा शहरासह परिसरातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये सरपंचपदासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या इच्छुकांचे लक्ष आता आरक्षणाच्या सोडतीकडे लागले आहे. त्यामुळे कोणाचे राजकीय गणित जुळणार आणि कोणाचे स्वप्न भंगणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. सरपंचपदाचे आरक्षण हे निवडणुकीपूर्वी निश्चित केले जाते. नांदेड जिल्ह्यात तालुकानिहाय सरपंचपदाचे प्रवर्गनिहाय आरक्षण महिलांसह निश्चित करण्यासाठी सोडत प्रक्रिया राबविण्यात येत आहे. हदगाव तालुक्यातही ही प्रक्रिया तहसील कार्यालयाच्या माध्यमातून पार पडणार आहे. नांदेड जिल्ह्यात सर्वात मोठ्या ग्रामपंचायत तामसा ग्रामपंचायतीच्या बाबतीत यापूर्वी झालेल्या आरक्षण सोडतीत ग्रामपंचायत स्थापन झाल्यापासून प्रथमच अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी सरपंचपद राखीव झाले होते. त्यामुळे त्या वेळी स्थानिक राजकीय समीकरणांना मोठा धक्का बसला होता. आता नव्याने होणाऱ्या आरक्षण सोडतीत कोणता प्रवर्ग निश्चित होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## देगलूर तालुका अध्यक्षपदी डी. जी. रातोळीकर यांची बिनविरोध निवड

मुखेड (स. गांवकरी) : तलाठी संघटनेचा कार्यकाळ संपल्यानंतर नव्याने तालुका अध्यक्ष पदी निवड झालेले कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जाणारे डी.जी. रातोळीकर यांची देगलूर येथे बिनविरोध निवड करण्यात आली. तलाठी संघटनेच्या अध्यक्षाचे स्थान आणि महत्व अत्यंत मोलाचे असते तलाठी हा महसूल विभागाचा सर्वात मुख्य घटक असतो जनतेशी थेट जोडलेला मुख्य दुवा म्हटलं जाते त्यामुळे संघटनेच्या अध्यक्षावर मोठी जबाबदारी असते तालुक्यातील सर्व तलाठ्याचे प्रतिनिधित्व करणे आणि त्यांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचविणे हे अध्यक्षाचे मुख्य काम असते कारण तलाठ्यावर होणारे अन्याय अत्याचार कामाच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणी किंवा राजकीय दबाव याबाबत कर्मचाऱ्यांचे संरक्षण करणे हे अध्यक्षाचे काम असते. थोडक्यात सांगायचे म्हणजे तलाठी संघटनेचा अध्यक्ष हा प्रशासन आणि तलाठी कर्मचारी यांच्यातील मजबूत पूल असतो जे की कर्मचाऱ्याला हितासोबतच महसूल व्यवस्थेचे कामकाज सुरळीत चालण्यास मदत करते समजा एखाद्या वर्षी आपत्ती आली पूर किंवा दुष्काळ पडला पिकाचे नुकसान झाल्यावर थेट बांधावर जाऊन पंचनामे करण्याचे काम तलाठी करत असतात यावेळी अध्यक्षाच्या मार्गदर्शनाखाली ही कामे वेगाने करण्यास मदत लागते. या निवडीबद्दल संघटना शेतकरी नेते गावातील नागरिक ग्रामस्थ संघटनेचे पदाधिकारी अध्यक्षाचे जाहीर आभार मानले व रातोळीकर यांना शुभेच्छा देऊन त्यांच्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

## सैनिक फेडरेशनचा विभागीय महामेळावा संपन्न

मुखेड (स. गांवकरी) : सैनिक फेडरेशनचे अध्यक्ष माजी खासदार तथा सेवानिवृत्त ब्रिगेडियर सुधीर सावंत यांच्या अध्यक्षतेखाली सैनिक फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी निंबाळकर, मराठवाडा अध्यक्ष लक्ष्मण देवदे, व नांदेड जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील डूमणे, सर्व तालुक्याचे तालुका प्रमुख संघटनेचे प्रमुख पदाधिकारी जिल्हातील व शहरातील आजी-माजी सैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते वरील कार्यक्रमात सैनिकांच्या अडचणी बाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी वेळ घेऊन चर्चा करणार असल्याचे सुधीर सावंत यांनी सांगितले येणाऱ्या डिसेंबर महिन्यात महाराष्ट्र स्तरीय महामेळावा मुंबई येथे घेण्याचे ठरवले आहे मुंबई येथील महामेळाव्याच्या अनुषंगाने जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व मराठवाड्यातील जिल्हाप्रमुखांना सुधीर सावंत व निंबाळकर यांनी सूचना केल्या आहेत.

### निवासी अंध विद्यालय वसरणीचे मुख्याध्यापक राष्ट्रीय समता गौरव पुरस्कार अंतर्गत

# समता दूत दिव्यांग शिक्षणरत्न पुरस्काराने सन्मानित

नवीन नांदेड : (स. गांवकरी)



वसरणी ज्योतीबा फुले सेवा ट्रस्ट नांदेड संचलित, निवासी अंध विद्यालय वसरणी नांदेड या शाळेचे मुख्याध्यापक बाबाराव माधवराव इबितवार (नंदेवार) यांना दिव्यांग क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्या बाबत मातोश्री लक्ष्मीबाई ठाकुर बहूउददेशीय सेवाभावी संस्था व मायडी बहूउददेशीय सेवाभावी संस्था नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय समता गौरव पुरस्कार अंतर्गत समता दुत दिव्यांग शिक्षण रत्न पुरस्कार 2026 देऊन सोहळ्यात सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक भारतजी वानखेडे, संचालक जीमखाना मॅको बँक मंत्रालय मुंबई, तथा अध्यक्ष अनुसुचित जाती – जमाती, विजा, भज, विमाप्र/शा.नि. कर्मचारी संघटना मंत्रालय मुंबई व मा.सय्यद मुजिद सय्यद जाहेद ,इंजि. अंबादासजी चंदनशीवे उपसचिव कृषी विभाग मंत्रालय,मुंबई, धर्मगुरु संत सुकविंदरसिंघ बाबा, राजकुमार इंगळे, ॲड.गोणारकर,प्रा.जे.टी. जाधव यांच्या शुभहस्ते राष्ट्रीय समता गौरव पुरस्कार अंतर्गत समता दुत दिव्यांग शिक्षणरत्न पुरस्कार 2026 एका शाही सोहळयामध्ये त्यांना पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.

यावेळी पुरस्कार स्विकारतांना त्यांच्या पत्नी सौ. संजिवनी नंदेवार, मातोश्री श्रीमती अनुसया,मुलगा,डॉ. कृष्णप्रसाद,मुलगी पुजा नातेवार, आरती चुडेवार,कु.अमोदिनी, कु.रुद्रानी कलाल गौड तेलंग समाजाचे युवा प्रदेशाध्यक्ष सुनिल आनंतवार, कॉम्रेट राज्यसचिव उज्वला पडलवार,कॉम्रेट गंगाधर, नांदेड जिल्हा कलालगौड समाजाचे सचिव गंगाधर नंदेवाड, जिल्हा ग्राहक मंचाचे जिल्हाध्यक्ष डॉ.सायन्ना मठमवार,सामाजिक कार्यकर्ते अशोक नातेवार, गणेश बच्चेवार यांच्या समवेत पुरस्कार देण्यात आला. यावेळी समाजा तर्फे आखिल भारतीय कलवार, कलाल, कलार महासभा दिल्ली तर्फे बाबाराव माधवराव इबितवार यांना नांदेड जिल्हा प्रभारी म्हणुन नियुक्तीपत्र देण्यात आले.

दिव्यांग क्षेत्रात उल्लेखनिय व प्रेरणादयी कार्य करुन समाजाला दिलेल्या मौलाच्या योगदाना बदल आपल्या कार्यातून समाजाला सकारात्मक दिशा मिळाली असून आपल्या योगदानामुळे समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि मानवता या भारतीय संविधानाच्या मुल्यांना बळकटी मिळत आहे.

आपण आपल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे निष्ठेने आणि सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून केलेली उल्लेखनिय कामगीरी निश्चितच प्रेरणादायी आहे. आपल्या कृतुत्वाची दखल घेवून समाजाप्रती असलेल्या आपल्या योगदाना बदल कृतज्ञता व्यक्त करीत आपणांस हा सन्मान आदरपूर्वक देण्यात आला असे श्री. भारतजी वानखेडे यांनी म्हटले आहे. त्यांनी मागील 33 वर्षापासून अंध मुलांसाठी शाळेत विविध उपक्रम राबवून अंध विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात कलागुणांचा विकास केला आहे. तसेच अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात पूनर्वशीत केले आहे. दिव्यांग मुलांचा सर्वांगीन विकास व पुनर्वसनाचे उत्कृष्ट कार्य करत आहेत.

आपल्या शाळेच्या माध्यमातून अंध विद्यार्थ्यांना प्रवेशीत करुन गुणवत्तापूर्वक शिक्षण देवून त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्याची प्रेरणा देत आहेत. खेडयापाडयात घरोघरी जावून दिव्यांग विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून खेडोपाडी जावून दिव्यांग विद्यार्थ्यांना शाळेच्या सर्वसामान्य प्रवाहात आणण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहेत.

## गर्भावस्थेत गंभीर हृदयविकाराचे निदान

पुणे : (स. गांवकरी)

मणिपाल हॉस्पिटल, बाणेर येथील डॉक्टरांनी हृदयविकाराचा कोणताही पूर्वइतिहास नसलेल्या ३१ वर्षीय महिलेच्या गर्भावस्थेदरम्यान गंभीर हृदयविकाराचे निदान करून तिच्यावर यशस्वी उपचार केले. गर्भावस्थेच्या ३४व्या आठवड्यात तिला सौम्य स्वरूपाचा श्वास लागणे, हृदयाची धडधड वाढणे आणि अस्वस्थता जाणवू लागली. सुरुवातीला ही लक्षणे गर्भावस्थेच्या शेवटच्या टप्प्यातील सामान्य बदलांशी संबंधित असावीत असे वाटत असले, तरी लक्षणांमध्ये झालेला बदल लक्षात घेऊन पुढील तपासण्या करण्यात आल्या. तपासणीत तिच्या हृदयाची कार्यक्षमता गंभीररीत्या कमी झाल्याचे आढळले. हृदयाची रक्त पंप करण्याची क्षमता दर्शविणारे लेफ्ट व्हेंट्रिक्युलर इजेक्शन फ्रॅक्शन (LVEF) अवघे २४ टक्के होते. तिची प्रकृती लक्षात घेऊन तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि कार्डिओलॉजी, स्त्रीरोग व प्रसूती, क्रिटिकल केअर आणि कार्डियाक अॅनेस्थेशिया तज्ज्ञांच्या समन्वयाने उपचार सुरू करण्यात आले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सी-सेक्शनद्वारे प्रसूती करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर महिलेने २.६ किलो वजनाच्या निरोगी मुलीला जन्म दिला. पेरिपार्टम कार्डिओमायोपॅथी हा गर्भावस्थेच्या शेवटच्या काळात किंवा प्रसूतीनंतर उद्भवणारा दुर्मिळ हृदयविकार आहे. भारतातील एका अभ्यासानुसार, दर १,५४१ जिवंत जन्मांमागे साधारण एका महिलेमध्ये हा आजार आढळतो.

- मणिपाल हॉस्पिटलमध्ये आई आणि बाळाचे प्राण वाचवण्यात यश
- हृदयविकाराचा पूर्वइतिहास नसलेल्या महिलेच्या हृदयाची पंपिंग क्षमता अवघी २४ टक्के
- वेळेवर उपचार आणि तज्ज्ञांच्या समन्वयातून सुरक्षित प्रसूती

## फिनिक्स मार्केटसिटीमध्ये आकाश आयचे झाइस व्हिजन सेंटर सुरू

पुणे : (स. गांवकरी)

पुण्यातील नेत्रसेवा क्षेत्रातील आघाडीचे आकाश आय क्लिनिक अँड लेझर सेंटरने झाइस इंडियाच्या सहकार्याने फिनिक्स मार्केटसिटी येथे झाइस व्हिजन सेंटर बाय आकाश आय सुरू केले आहे. या केंद्राच्या उद्घाटनामुळे पुण्यातील झाइस व्हिजन सेंटरची संख्या चार झाली असून, नेत्रसेवा किरकोळ विक्री केंद्राच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेले हे शहरातील पहिले झाइस व्हिजन सेंटर आहे.

पुण्यात २५ वर्षांहून अधिक काळ नेत्रसेवा क्षेत्रात कार्यरत असलेल्या आकाश आय क्लिनिक अँड लेझर सेंटरने सुरू केलेल्या या केंद्रात झाइसच्या अचूक प्रकाशिकी तंत्रज्ञानासह प्रगत दृष्टीसेवा उपाय आणि आकाश आयची नेत्रसेवेतील तज्ज्ञता एकत्रित करण्यात आली आहे. ग्राहकांच्या दृष्टीविषयक गरजा, जीवनशैली आणि दैनंदिन वापर लक्षात घेऊन वैयक्तिक सल्लामसलत आणि योग्य



### पुण्यात प्रीमियम नेत्रसेवा सुविधांचा विस्तार

दृष्टीसेवा उपाय उपलब्ध करून देण्यावर केंद्राचा भर आहे.

फिनिक्स मार्केटसिटीमधील जी२३, तळमजला, बोसजवळ आणि युनिक्लोसमोर, फिनिक्स अव्हेन्यू ऑफ स्टार्स, पुणे-नगर रोड, विमान नगर येथे सुमारे १,८०० चौरस फुटांच्या जागेत हे केंद्र उभारण्यात आले आहे. आधुनिक आणि दर्जेदार वातावरणात ग्राहकांना दृष्टीसेवेचा अनुभव मिळावा, या दृष्टीने केंद्राची रचना करण्यात आली आहे. या केंद्राच्या उद्घाटनाबाबत आकाश आय क्लिनिक अँड लेझर सेंटरचे मालक डॉ. विठ्ठल सातव म्हणाले, "झाइसच्या प्रगत दृष्टीसेवा तंत्रज्ञानाला आमच्या नेत्रसेवेतील अनुभवाची जोड देऊन ग्राहकांना अधिक चांगला आणि वैयक्तिक अनुभव देण्याचा आमचा प्रयत्न आहे. पुण्यातील ग्राहकांच्या बदलत्या दृष्टीविषयक गरजा लक्षात घेऊन या केंद्राची उभारणी करण्यात आली आहे." झाइस इंडियाचे भारत व शेजारील बाजारपेठांसाठी दृष्टीसेवा विभागाचे व्यवसाय प्रमुख रोहन पॉल म्हणाले, "तंत्रज्ञान, अचूकता आणि वैयक्तिक ग्राहक अनुभवाला महत्त्व देणाऱ्या भागीदारांसोबत काम करून उच्च दर्जाची दृष्टीसेवा अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचवणे हे आमचे उद्दिष्ट आहे. आकाश आय क्लिनिक अँड लेझर सेंटरसोबत पुण्यात झाइस व्हिजन सेंटरचा अनुभव उपलब्ध करून देताना आम्हाला आनंद होत आहे. या केंद्रामधून ग्राहकांना झाइसच्या प्रगत दृष्टीसेवा उपायांसोबत वैयक्तिक सल्लामसलतीचा लाभ सोयीस्कर वातावरणात घेता येईल."

## आंतरराष्ट्रीय समुद्रकिनारा स्वच्छता दिनानिमित्त पालघर, डहाणू, वसई व तलासरी तालुक्यांत स्वच्छता उपक्रम





पालघर : (स. गांवकरी)

'स्वच्छता ही सेवा २०२६' आणि 'सेवा संकल्प अभियान'अंतर्गत आंतरराष्ट्रीय समुद्रकिनारा स्वच्छता दिनानिमित्त पालघर जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवर व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या मोहिमेत नागरिकांसह विविध घटकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत समुद्रकिनाऱ्यांच्या स्वच्छतेचा संदेश दिला. १९ सप्टेंबर रोजी पालघर, डहाणू, वसई आणि तलासरी तालुक्यांतील विविध समुद्रकिनाऱ्यांवर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

ग्रामपंचायती, शासकीय विभाग, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट, युवक, विद्यार्थी तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाले. नागरिकांच्या सहभागातून समुद्रकिनाऱ्यांवरील कचरा संकलित करून परिसर स्वच्छ करण्यात आला. ग्रामपंचायत झाई-बोरिगाव तसेच डहाणू तालुक्यातील नरपड येथेही आंतरराष्ट्रीय समुद्रकिनारा स्वच्छता दिनानिमित्त विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमातून समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता राखणे, प्लास्टिक व इतर कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे तसेच सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छतेमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविण्याचा संदेश देण्यात आला.

'स्वच्छता ही सेवा' अभियानाच्या माध्यमातून स्वच्छतेला केवळ एक दिवसाचा उपक्रम न ठेवता लोकसहभागातून ती नियमित चळवळ बनविण्यावर भर देण्यात येत आहे. 'सेवा संकल्प अभियान'अंतर्गत विविध लोकाभिमुख उपक्रमांसोबतच पर्यावरण व सार्वजनिक स्वच्छतेशी संबंधित उपक्रमांनाही व्यापक स्वरूप देण्यात येत आहे.

## महिला शेतकऱ्यांनी प्रमाणपत्रासाठी नोंदणी करावी

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, 2026 अंतर्गत शेती व शेतीपूरक व्यवसायामध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या महिलांना अधिकृत ओळख मिळावी आणि कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेणे सुलभ व्हावे, यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्राची ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील पात्र महिला शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभ घेऊन प्रमाणपत्रासाठी नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी केले आहे.

महिला शेतकरी प्रमाणपत्राद्वारे शेती किंवा शेतीशी संबंधित कामामध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या महिलेला अधिकृत महिला शेतकरी म्हणून मान्यता देण्यात येते. महिलेच्या नावावर जमीन असणे हा एकमेव निकष नसून, शेती व संलग्न कृषी कार्यातील प्रत्यक्ष सहभागाला महत्त्व देण्यात आले आहे. पीक उत्पादन व लागवड, बीज उत्पादन, फलोत्पादन, फुलशेती, भाजीपाला उत्पादन, पशुपालन व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, शेळी-मेंढी पालन, कुक्कुटपालन, मधमाशीपालन, मत्स्य व्यवसाय, रेशीम उत्पादन, गांडूळखत व कंपोस्ट निर्मिती, अळंबी उत्पादन, कृषीमाल प्रक्रिया व मूल्यवर्धन यासह विविध शेतीपूरक उपक्रमांमध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या महिलांचा यामध्ये समावेश होऊ शकतो.

महिला शेतकरी म्हणून अधिकृत नोंदणी झाल्यामुळे कृषी विभागाच्या विविध योजना व सुविधांमध्ये महिला शेतकऱ्यांची ओळख सुलभ होण्यास मदत होणार आहे. कृषी कर्ज, पीकविमा, कृषी निविष्ठा, प्रशिक्षण, विस्तार सेवा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी हे प्रमाणपत्र उपयुक्त ठरू शकते.

# किनवटमध्ये १६.३७ कोटींच्या शासकीय निधी व्यवहारांचा आरोप

### २८० शासकीय धनादेशांद्वारे खासगी खात्यांमध्ये रक्कम वर्ग केल्याचा दावा; वरिष्ठ लिपिक तथा रोखपालाविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल

किनवट : (स. गांवकरी)

किनवट येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाशी संबंधित शासकीय निधीच्या व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. शासकीय SBI बँक खाते क्रमांक 62021247863 मधून तब्बल १६ कोटी ३७ लाख ६६ हजार ९१२ रुपये विविध खासगी व्यक्ती, व्यावसायिक दुकाने तसेच इतर अशासकीय घटकांच्या बँक खात्यांमध्ये वर्ग केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी किनवट पोलिस ठाण्यात गु.र.नं. २५६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस तपासाला सुरुवात झाली आहे. प्राप्त माहितीनुसार, १ एप्रिल २०२४ ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत संबंधित शासकीय बँक खात्यातून हे व्यवहार झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या कालावधीत तब्बल २८० शासकीय धनादेश बँकेमार्फत क्लिअरिंग करून वटविण्यात आले आणि त्यातून काढण्यात आलेली रक्कम अधिकृत शासकीय वापराऐवजी खासगी व अशासकीय घटकांच्या खात्यांमध्ये वर्ग करण्यात आल्याचा आरोप आहे.

या प्रकरणातील २८० शासकीय धनादेश तपासाचा केंद्रबिंदू ठरण्याची शक्यता आहे. प्रत्येक धनादेश कोणत्या कारणासाठी काढण्यात आला, त्यावर कोणाच्या स्वाक्षऱ्या आहेत, धनादेश कोणाच्या नावे होते, कोणत्या बँक खात्यात रक्कम जमा झाली आणि त्या व्यवहाराला संबंधित कार्यालयाची अधिकृत मंजुरी होती का, याची तपासणी पोलिसांकडून केली जाण्याची शक्यता आहे. तसेच संबंधित कालावधीतील बँक स्टेटमेंट, धनादेश नोंदवही, रोकडवही, कार्यालयीन मंजुरीपत्रे, देयकांची कागदपत्रे आणि लाभार्थ्यांच्या खात्यांची माहिती तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे. या सर्व कागदपत्रांच्या पडताळणीतून प्रत्यक्षात किती रक्कम कोणत्या कारणासाठी खर्च झाली आणि किती रक्कम अनधिकृतरीत्या वर्ग झाली, याबाबत अधिक स्पष्टता निर्माण होऊ शकते. तक्रारीमध्ये शासकीय खात्यातून काढण्यात आलेली रक्कम खासगी त्रयस्थ व्यक्ती, व्यावसायिक दुकाने आणि इतर अशासकीय खासगी घटकांच्या बँक खात्यांमध्ये वर्ग करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या खात्यांची ओळख पटविणे आणि त्यांच्याशी संबंधित व्यवहारांची साखळी तपासणे हे तपासातील महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.रक्कम कोणाच्या खात्यात, कोणत्या तारखेला आणि कोणत्या कारणास्तव वर्ग करण्यात आली, त्यानंतर त्या रकमेतून पुढे कोणते व्यवहार झाले, याची आर्थिक तपासणी झाल्यास या प्रकरणाचे स्वरूप अधिक स्पष्ट होऊ शकते. केवळ बँक व्यवहारांपुरतेच हे प्रकरण मर्यादित नसून, शासकीय अभिलेख आणि धनादेश नोंदवहीमध्ये कथित फेरफार व बनावटीकरण केल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. शासकीय निधीच्या प्रत्येक व्यवहाराची अधिकृत नोंद ठेवणे आवश्यक असताना नोंदींमध्ये फेरफार झाल्याचा आरोप गंभीर मानला जात आहे.या पार्श्वभूमीवर संबंधित कार्यालयातील मूळ अभिलेख पोलिस तपासासाठी ताब्यात घेतले जातात का.

### पदाचा गैरवापर केल्याचा आरोप

या प्रकरणात भगवान उद्धवराव डवरे, वय ३९ वर्षे, वरिष्ठ लिपिक तथा रोखपाल, यांच्यासह इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, संबंधित आरोपीने आपल्या पदाचा कथित गैरवापर करून शासकीय निधीशी संबंधित आर्थिक व्यवहार केले. शासकीय धनादेश, धनादेश नोंदवही आणि इतर अधिकृत अभिलेखांमध्ये फेरफार करून आर्थिक व्यवहार लपविण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. शासकीय कार्यालयातील रोखपाल म्हणून आर्थिक व्यवहारांशी संबंधित जबाबदारी असलेल्या व्यक्तीविरुद्ध एवढ्या मोठ्या रकमेच्या व्यवहारांचा आरोप झाल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. मात्र, या आरोपांची सत्यता तपासातूनच स्पष्ट होणार आहे.

# आमदार नंदकिशोर महाजन यांचा खिर्डी येथे सत्कार

## शिक्षक व विद्यार्थ्यांशी साधला संवाद !

रावेर : (स. गांवकरी)

तालुक्यातील विद्या विकास मंडळ संचलित श्रीमती शांताबाई प्रल्हाद राणे माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खिर्डी खुर्द यांच्या वतीने विधानपरिषद आमदार म्हणून बिनविरोध निवड झाल्याबद्दल , आमदार नंदकिशोर महाजन यांचा नुकताच सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेच्या वतीने आमदार महाजन यांचा जंगी सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना त्यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या, तसेच शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम भावी पिढी घडविणाऱ्या शिक्षकवृंदाचे विशेष कौतुक केले. अध्यक्षीय भाषणात विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष ॲड. संदीप भंगाळे यांनी आमदार महाजन यांच्या कार्याचा गौरव केला .




तर उपाध्यक्ष विलास पाटील यांनी आपल्या मनोगतातून नंदकिशोर महाजन यांच्या राजकीय व सामाजिक प्रवासाचा सविस्तर आढावा घेतला. या सोहळ्याला भाजप तालुकाध्यक्ष दुर्गेश पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष विलास पाटील, चिटणीस घनःश्याम भंगाळे, चेअरमन सुनील कोल्हे, निळकंठ बढे, राहुल फालक, भगवान पाटील, जगदीश पाटील, सतीश फेगडे, राजेंद्र पाटील, हेमराज किरंगे, दुर्गादास बोंडे, भरत लढे, पंकज पाटील, गुणवंत पाटील, प्रभाकर महाजन, अनिल विठ्ठल चौधरी, माजी पोलिस पाटील प्रदीप पाटील जाबीर बेग, इमरान शेख, जाकीर पिंजारी, अल्ताफ बेग, किसन महाजन, प्रभाकर कडू महाजन, मनोज भंगाळे, अनिल चौधरी या मान्यवरांसह परिसरातील ग्रामस्थ, शिक्षकवृंद, विद्यालयाचे पदाधिकारी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप पाटील व भोई सर यांनी केले, तर आभार हेमराज किरंगे यांनी मानले.



घणसोलीचा लाडका विघ्नहर्ता आयोजित कार्यक्रम सहयोग सामाजिक संस्था ( अनाथ आश्रम) घणसोली या लहान मुलांना त्यांच्या शिक्षणासाठी, दैनिक जीवनात उपयोगी येणाऱ्या वस्तू आणि बरेच काही अन्नदान करण्यात आलं आहे. तसेच मा.खा. संजीवजी गणेश नाईक. लक्ष्मीकांत पाटील नगरसेवक. गणेश सपकाळ नगरसेवक. हरिष वाघमारे.मा.नगरसेवक .यांनी पण आपली उपस्थितीत दाखवली गणरायाचे दर्शन घेतले.

## थोडक्यात बातम्या...



### देवपे व मातावाडीतील आदिवासी महिलांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील देवपे गावातील महिला व मातावाडी येथील आदिवासी महिलांसाठी गौरी गणपती सणा निमित्त जीवनावश्यक वस्तूंचे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्री राजे छत्रपती युवा प्रतिष्ठान, मुरबाड यांच्या वतीने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. हा कार्यक्रम हनुमान मंदिरा समोर, देवपे येथे संपन्न झाला. सदर कार्यक्रमाला नानजीभाई खिमजीभाई ठक्कर एन.के. टी. ठाणावाला चॅरिटेबल ट्रस्ट, ठाणे व गुंज फाउंडेशन आणि ग्रामस्थ मंडळ, देवपे यांचे लाभले आहे. आयोजक - नरेश म्हाडसे अध्यक्ष - श्री राजे छत्रपती युवा प्रतिष्ठान यांनी अतिपरिश्रम घेतले. गेल्या अनेक वर्षांपासून श्री राजे छत्रपती युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून मुरबाड तालुक्यात विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक उपक्रम राबविले जातात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपत आदिवासी व गरजू महिलांपर्यंत मदत पोहोचविण्याचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले. त्यावेळी राकेश गायकर, सचिन गायकर, भावेश गायकर, तुकाराम जामदरे, संतोष जमदरे,अनंत जमदरे व प्रतिष्ठानचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

### मुंब्रा पोलिसांच्या अवाहनाला दिव्यातील गणेशोत्सव मंडळांचा प्रतिसाद




ठाणे (स. गांवकरी) : ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या मार्गदर्शनाखाली आणि मुंब्रा पोलीस स्टेशनच्या विशेष आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत, गणेशोत्सवाच्या औचित्याने 'आर के ग्रुप मित्र मंडळ - दिव्याचा आराध्य' यांच्या वतीने विविध सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेमध्ये इयत्ता ७ वीतील विद्यार्थी प्रतीक चिखले याने मांडलेले विचार सध्या कौतुकाचा विषय ठरत आहेत. ठाणे शहर पोलिसांच्या वतीने संपूर्ण राज्यात समाजजागृतीसाठी "ड्रग्स फ्री महाराष्ट्र" हा अत्यंत महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविला जात आहे. याच विषयाचे गांभीर्य ओळखून मंडळाने निबंध स्पर्धेसाठी "ड्रग्स फ्री महाराष्ट्र" हा मुख्य विषय ठेवला होता. या स्पर्धेत चिमुकल्या प्रतीक चिखले याने अतिशय सुंदर, विचारप्रवर्तक आणि व्यसनमुक्तीचा सकारात्मक संदेश देणारा निबंध लिहून उपस्थितांची मने जिंकली. पोलीस प्रशासनाकडून चालवल्या जाणाऱ्या या मोहिमेला शाळकरी विद्यार्थ्यांच्या विचारांची आणि लेखणीची जोड मिळणे, ही निश्चितच समाजासाठी आशादायक आणि कौतुकास्पद बाब ठरत आहे. विद्यार्थ्यांच्या या संवेदनशील प्रयत्नाची दखल घेत, प्रतीक चिखले याने लिहिलेला हा सुंदर निबंध थेट ठाणे शहर पोलिसांपर्यंत सन्मानाने पोहोचवण्याची जबाबदारी 'दिव्याचा आराध्य' मंडळाने घेतली आहे. त्या अनुषंगाने या निबंधाची डिजिटल (PDF) प्रत पोलीस प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात येत आहे. "विद्यार्थ्यांच्या लेखणीतून समाजजागृती आणि या समाजजागृतीतूनच घडेल ड्रग्समुक्त महाराष्ट्र!" असा विश्वास व्यक्त करत दिव्याचा आराध्य मंडळाच्या या स्तुत्य उपक्रमाचे व बालक प्रतीक चिखले याच्या विचारांचे सर्व स्तरातून विशेष कौतुक केले जात आहे.

# कळवणच्या पश्चिम पट्ट्यात अंधाराचे साम्राज्य

## शेतकऱ्यांच्या घरी रात्रीचा अंधार गांगुर्डेंचा महावितरणला रास्ता रोकोचा इशारा!

कनाशी : (स. गांवकरी)

कळवण तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात महावितरणच्या आणि अनधिकृत भारनियमनामुळे शेतकरी पुरता त्रस्त झाला आहे. ऐन गणेशोत्सवात आणि कांदा लागवडीच्या हंगामात वीज गायब होत असल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती आहे. या संतापजनक प्रकाराविरोधात कॉंग्रेस तालुकाध्यक्ष के. के. गांगुर्डे यांनी आक्रमक भूमिका घेत महावितरणला निवेदन दिला आहे.

महावितरणच्या कळवण उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता यांना दिलेल्या निवेदनात गांगुर्डे यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, तात्काळ भारनियमन थांबवून सुरळीत वीज पुरवठा सुरू करा, अन्यथा जिल्हाध्यक्ष रमेशभाऊ कहांडोळे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसह रास्ता रोको आंदोलन करू.



> पश्चिम पट्ट्यात जिथे गरज आहे तिथे लवकरच मेंटेनन्सचे काम हाती घेतले जाईल. सध्या कोणतेही लोडशेडिंग नाही, वीज पुरवठा सुरळीत आहे. ज्या भागात मेंटेनन्स बाकी आहे, तिथे तातडीने काम करू. नागरिकांना माझी विनंती आहे की, हिटर, शेगडी यांसारखी जास्त वीज ओढणारी अनधिकृत उपकरणे वापरू नयेत अन्यथा दंडात्मक कारवाई होईल. सर्वांनी वीज बिल भरून सहकार्य करावे.
>
> **- योगेश जगदाळे, उपकार्यकारी अभियंता, महावितरण, कळवण**

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संपूर्ण राज्यात गणेशोत्सवाचा उत्साह सुरू असताना कळवणमध्ये भारनियमनामुळे गणेश मंडळे, गावातील नागरिक आणि पोलीस पाटलांची प्रचंड गैरसोय होत आहे. दुसरीकडे पावसाने उघडीप दिल्याने शेतातील पिकांना पाण्याची नितांत गरज आहे, काही ठिकाणी कांदा लागवड सुरू झाली असून सुरळीत विजेअभावी तीही खोळंबली आहे.

या निवेदनादरम्यान महाविकास आघाडीची एकजूट दिसून आली. यावेळी आदिवासी सेलचे जिल्हाध्यक्ष राम चौरे सरचिटणीस योगेश गायकवाड ओबीसी तालुकाध्यक्ष बापू भावसार सोशल मीडिया अध्यक्ष नारायण गांगुर्डे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे तालुकाध्यक्ष संतोष देशमुख आदिवासी सेल अध्यक्ष रामा पाटील शिवसेना (उबाठा गट) चे तालुकाध्यक्ष अंबादास जाधव व महिला अध्यक्षा शितल महाजन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ७३ हजार ७४८ नागरिकांची आरोग्य तपासणी

नाशिक : (स. गांवकरी)

मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा'अभियानास नाशिक जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. गणेशोत्सवाच्या कालावधीत २० सप्टेंबर २०२६ पर्यंत जिल्ह्यात विविध ठिकाणी १ हजार ७२५ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांमधून ७३ हजार ७४८ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली असल्याची माहिती मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे निवासी उपजिल्हाधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी रोहितकुमार राजपुत यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे. या अभियानांतर्गत नागरिकांना विविध वैद्यकीय विभागांमार्फत आवश्यक तपासणी, उपचार तसेच पुढील उपचारासाठी संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात आली. तपासणी झालेल्यांमध्ये ३१ हजार ७९७ पुरुष, ३१ हजार ४१२ महिला आणि १० हजार ३६० बालकांचा समावेश आहे. अभियानांतर्गत हृदयविकार विभागामार्फत १ हजार ३०१, मेडिसिन/कार्यचिकित्सा विभागातून २८ हजार ७५९, शल्यतंत्र विभागातून ८३६, अस्थिविकार विभागातून २ हजार १७०, बालरोग विभागातून ५ हजार ७२५, स्त्रीरोग विभागातून ४ हजार ४१, कान-नाक-घसा विभागातून २ हजार ५५, नेत्रविकार विभागातून २ हजार ८१४, त्वचारोग विभागातून १ हजार ५९३ तसेच इतर विकारांच्या ५ हजार १२४ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

# गौरी मातेच्या आगमनानिमित्त अनोखा उपक्रम

भिवंडी : (स. गांवकरी)

गौरी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी हार-फुले, मोदक किंवा पेढे न आणता शैक्षणिक साहित्य आणावे, असे आगळेवेगळे आवाहन भिवंडी तालुक्यातील आतकोली येथील सामाजिक कार्यकर्ते पंकज भोईर यांनी केले होते. त्यांच्या या आवाहनाला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य भेट देऊन सामाजिक उपक्रमाला हातभार लावला. गौरी मातेच्या दर्शनासाठी येताना भाविकांनी वही, पेन, पेन्सिल, खोडरबर, चित्रकलेच्या वह्या आदी विद्यार्थ्यांच्या उपयोगी साहित्य आणावे, असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार अनेक भाविकांनी भक्तिभावासोबत सामाजिक बांधिलकी जपत शैक्षणिक साहित्य अर्पण केले. त्यामुळे गौरी मातेच्या उत्सवाला सामाजिक उपक्रमाची जोड मिळाली.




गेल्या सहा वर्षांपासून भोईर कुटुंबीयांकडून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात येत असून, परिसरातील नागरिकांकडूनही त्याचे कौतुक होत आहे. नागरिकांच्या सहकार्याने जमा झालेले शैक्षणिक साहित्य लवकरच एखाद्या दुर्गम भागातील शाळेतील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते पंकज भोईर यांनी दिली. 'गौरी मातेच्या चरणी अर्पण होणाऱ्या भक्तीला विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जोड मिळावी', या उद्देशाने सुरू असलेल्या या उपक्रमातून धार्मिक श्रद्धेसोबतच सामाजिक जबाबदारीचा सुंदर संदेश समाजापुढे ठेवण्यात आला आहे.

# लोकसहभागातून तरटीफाटा शाळेचा कायापालट

## 'मिशन आपुलकी'तून डिजिटल क्लासरूम, सुशोभीकरणासह विविध भौतिक सुविधा

पारनेर : (स. गांवकरी)

वडगाव सावताळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तरटीफाटा येथे 'मिशन आपुलकी' उपक्रमांतर्गत लोकसहभाग व माजी विद्यार्थी संघाच्या सहकार्याने सुमारे दीड लाख रुपये खर्च करून शाळेचा कायापालट करण्यात आला आहे. शालेय रंगकाम, सुशोभीकरण, साउंड सिस्टीम, डिजिटल क्लासरूम, विविध भौतिक सुविधांचे तसेच मुख्याध्यापक कार्यालयाचे लोकार्पणही करण्यात आले. या सुविधांचे लोकार्पण शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या शुभहस्ते झाले. शिष्यवृत्ती परीक्षा सन २०२५-२६ मध्ये शाळेतील १०० टक्के विद्यार्थी पात्र ठरल्याबद्दल पात्र विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षिका व मुख्याध्यापिका श्रीमती ज्योती जऱ्हाड यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास प्रभारी गटशिक्षणाधिकारी विनेश लाळगे, केंद्रप्रमुख दीपक लोंढे, सरपंच संजय रोकडे, राजेंद्र रोकडे, पंढरीनाथ रोकडे, बाबासाहेब दाते, माजी केंद्रप्रमुख गोरक्ष रोकडे, भाऊसाहेब शिंदे, बाबासाहेब चौधरी आदी प्रमुख उपस्थित होते. शाळेचा स्वच्छ व सुंदर परिसर तसेच विद्यार्थ्यांचा उत्साह पाहून समाधान व्यक्त करत, ग्रामस्थांच्या मागणीनुसार पुढील दोन दिवसांत शाळेसाठी एक शिक्षक उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन भास्कर पाटील यांनी दिले.




**शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या शुभहस्ते लोकार्पण**

> मिशन आरंभ या उपक्रमामुळे शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल वाढला आहे तसेच नवोदय विद्यालयामध्ये देखील 60 पैकी 58 विद्यार्थी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधून निवडले आहे ही बाब कौतुकास्पद आहे.विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी यासाठी कुसुमाग्रज वाचन अभियान तसेच रीडिंग बेल या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सर्व शिक्षकांनी करावी.
>
> **- श्री भास्कर पाटील (शिक्षणाधिकारी)**

यावेळी विनेश लाळगे, दीपक लोंढे, राजेंद्र रोकडे व भाऊसाहेब शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा प्रियंका रोकडे, उपाध्यक्षा योगिता जाधव, गुलाब रोकडे, अजय खोडदे, संदिप रोकडे, जगन्नाथ रोकडे, किरण साळुंके, विश्वनाथ रोकडे, तुकाराम साळुंके, सावळेराम आभाळे, मारुती साळुंके, जालिंदर शिंदे, सुनील जाधव, स्वप्निल गोसावी, दिलीप जाधव, आण्णा दाते, नामदेव जाधव, नितीन रोकडे, रोहिणी खोडदे, माधुरी जांभळकर, रोहिणी शिंदे, सोनाली मोहिते, अनिता जाधव, माया जाधव, प्रतिभा रोकडे, मनीषा रोकडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास संतोष खामकर, योगेश धुमाळ,शरद शेरकर,अविनाश शिंदे, संदिप खंडागळे, संकल्प शिंदे यांच्यासह ग्रामस्थ, पालक व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन ज्ञानेश्वर जाधव यांनी केले, तर आभार श्रीमती ज्योती जऱ्हाड यांनी मानले.

# पत्रकारितेच्या माध्यमातून समाजहिताचा जागर : डॉ. किशोर बळीराम पाटील



(स. गांवकरी)

- दै. 'स्वराज्य तोरण'च्या माध्यमातून उपेक्षितांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे संपादक
- सामाजिक बांधिलकी जपत सेवाकार्यातही योगदान

पत्रकारिता ही केवळ बातमी प्रसिद्ध करण्याचे माध्यम नसून समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्याचे, अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी आवाज उठविण्याचे आणि सामाजिक परिवर्तनाला दिशा देण्याचे प्रभावी साधन आहे. या विचारातून पत्रकारितेची वाटचाल करणारे दै. 'स्वराज्य तोरण'चे संपादक तथा स्वराज्य तोरण चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील यांचा २२ सप्टेंबर २०२६ रोजी वाढदिवस साजरा होत आहे. त्यानिमित्त त्यांच्या पत्रकारिता व सामाजिक कार्याचा हा विशेष आढावा. डॉ. किशोर पाटील यांनी पत्रकारिता क्षेत्रात प्रदीर्घ काळ कार्यरत राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिक, कष्टकरी, वंचित, आदिवासी, गरीब तसेच विविध सामाजिक घटकांच्या प्रश्नांना सातत्याने व्यासपीठ मिळवून देण्याचे काम केले आहे. दै. 'स्वराज्य तोरण' हे वृत्तपत्र त्यांच्या पत्रकारितेच्या ध्यासाचे आणि सामाजिक बांधिलकीचे माध्यम ठरले आहे. स्थानिक पातळीवरील नागरी समस्या, सामाजिक प्रश्न, शैक्षणिक उपक्रम, आरोग्यविषयक उपक्रम, प्रशासनाशी संबंधित नागरिकांच्या अडचणी तसेच समाजहिताच्या विविध विषयांना त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून स्थान दिले आहे. पत्रकारिता करताना केवळ बातमी देणे नव्हे, तर त्या बातमीमागील सामाजिक वास्तव समजून घेणे आणि संबंधित प्रश्न समाज व प्रशासनासमोर प्रभावीपणे मांडणे, हा त्यांच्या पत्रकारितेचा दृष्टिकोन राहिला आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाशी जोडले गेलेले डॉ. किशोर पाटील यांनी सामाजिक कार्यालाही तितकेच महत्त्व दिले आहे. स्वराज्य तोरण चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून आदिवासी, गरीब, गरजू, दिव्यांग तसेच अंध-अपंग बांधवांना मदतीचा हात देण्याचे कार्य करण्यात आले आहे. शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक मदत या क्षेत्रांत विविध उपक्रम राबविण्याचा त्यांचा प्रयत्न राहिला आहे. समाजातील विविध घटकांच्या अडचणी समजून घेत त्यांना मदत करण्याची भूमिका त्यांनी सातत्याने जपली आहे. त्यामुळे पत्रकार म्हणून असलेली सामाजिक संवेदनशीलता आणि समाजसेवक म्हणून असलेली बांधिलकी यांचा सुंदर संगम त्यांच्या कार्यात पाहायला मिळतो.

**पुरस्कारांनी कार्याची दखल**

डॉ. किशोर पाटील यांच्या पत्रकारिता व सामाजिक कार्याची विविध स्तरांवर दखल घेण्यात आली आहे. त्यांच्या परिचयपत्रातील माहितीनुसार त्यांना 'समाजसेवा रत्न गौरव पुरस्कार', 'भारत सेवा रत्न सुवर्णपदक', 'बाळशास्त्री जांभेकर प्रेरणा पत्रकार भूषण पुरस्कार', 'जीवन गौरव पुरस्कार', 'युवा प्रेरणा पुरस्कार', 'प्रेरणादायी पुरस्कार', 'राष्ट्रीय पत्रकारिता सम्राट पुरस्कार' आणि 'प्रसिद्धी नायक पुरस्कार' यांसह विविध सन्मान प्राप्त झाले आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून ८ नोव्हेंबर २०२१ रोजी मुंबईतील राजभवन येथे तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते 'समाज सेवा रत्न गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला होता. पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या प्रदीर्घ कार्याचीही विविध संस्थांनी दखल घेतली आहे. डॉ. किशोर पाटील यांची पत्रकारिता ही अभ्यास, अनुभव आणि सामाजिक बांधिलकी यांवर आधारलेली असल्याचे त्यांच्या कार्यातून दिसून येते. 'आपल्या लेखणीचा उपयोग समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी व्हावा', हा दृष्टिकोन त्यांनी जपला आहे. पत्रकारितेतील अनुभवातून सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करताना त्यांनी विविध विषयांवर लेखन केले असून 'आमचा वेगळा काव्य संग्रह' या पुस्तकाच्या माध्यमातून साहित्य क्षेत्रातही आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आजच्या बदलत्या माध्यमविश्वात पत्रकारितेसमोर अनेक आव्हाने असताना सामाजिक जाणीव, वस्तुनिष्ठता आणि लोकहिताचा दृष्टिकोन जपण्याची गरज अधिक आहे. अशा काळात दीर्घकाळ पत्रकारितेत कार्यरत राहून स्थानिक प्रश्नांना व्यासपीठ देणाऱ्या डॉ. किशोर पाटील यांचा वाढदिवस हा त्यांच्या कार्याचा गौरव करण्याबरोबरच पत्रकारितेतील सामाजिक बांधिलकीची आठवण करून देणारा दिवस ठरतो. २२ सप्टेंबर रोजी वाढदिवसानिमित्त डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि पत्रकारिता व समाजसेवेच्या कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २७८ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार दि. २२ सप्टेंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# काटकसरीने कारभार करून अमृतसागर दूध संघाची प्रगती कडे वाटचाल : चेअरमन मा. आ.वैभवराव पिचड

## अमृतसागर दूध संघाची वार्षिक सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

**अकोले (समर्थ गांवकरी)**

अमृतसागर दूध संघाचा कारभार काटकसरीने चालू असल्याने दूध संघाची प्रगतीकडे वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन अमृतसागर सहकारी दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघाचे चेअरमन आ.वैभवराव पिचड यांनी केले.

ते अमृतसागर दूध संघाच्याव्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

यावेळी जेष्ठ नेते गिरजाजी जाधव,कचरू पा.शेटे, प्रवीर मालुंजकर,चिमाजी वाळेकर,विठ्ठलराव डुंबरे,सीताराम भांगरे, राजेंद्र देशमुख,सुनील दातीर,सुधाकर देशमुख,राहुल देशमुख, प्रवीण धुमाळ,रवींद्र हांडे,सोपान मांडे,शरद नवले,भाऊसाहेब औटी,संघाचे व्हॉईस चेअरमन रावसाहेब वाकचौरे , संचालक गोरक्ष मालंजकर , आप्पासाहेब आवारी,आनंदराव वाकचौरे,गंगाराम नाईकवाडी, अरुण गायकर,शरद चौधरी, जगन देशमुख,रामदास आंबरे , सुभाष डोंगरे,बाबुराव बेनके,सौ .अश्विनी धुमाळ, सौ.सुलोचना औटी ,शिवाजी गायकर,दयानंद वैद्य,बाळासाहेब मुंढे तसेच कार्यकारी संचालक दादाभाऊ सावंत,सर्व दूध संस्थांचे पदाधिकारी, दूध उत्पादक शेतकरी,अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चेअरमन वैभवराव पिचड पुढे म्हणाले की, सभासदांनी केलेल्या सूचनांची दखल घेऊन योग्य ते बदल केले जातील असे सांगून सन २०२५-२६ या वर्षात संघाने केलेल्या कामाचा अहवाल विशद केला.सर्व संचालकांच्या पाठपुराव्यामुळेकिसान संपदा योजनेअंतर्गत मंजूर प्रकल्प व जिल्हा वार्षिक योजनेतून स्टोरेज टँक(सायलो),सचिवसंयंत्र बल्क कुलर मिळाल्याची माहिती दिली.

ब्राह्मणवाडा येथील दूध शीतकरण इमारतीचे व स्थावर मालमत्ता साठी शासनाने निर्धारित केलेली रक्कम रुपये ९७ लाख रुपयांची परतफेड संघाने केली असून अकोले येथील दूध शीतकरण इमारत व स्थावर मालमत्ता व्या साठी शासनाकडे पाठपुरावा चालू असल्याचे सांगितले.अन्न व औषध प्रशासन आयुक्त मा.तुकाराम मुंढे यांनी केलेल्या कायद्याची कठोर अंमलबजावणी मुळे गुणवत्ता सुधारणा,भेसळ यावर नियंत्रणआल्यामुळे खाजगी व्यावसायिकांना चांगलाच लगाम बसला असून सर्व सहकारी दूध संस्थाच्या पथ्यावर पडले आहे.सभासदांनी केलेल्या सूचनेनुसार आयुक्त.मा तुकाराम मुंढे यांच्या चांगल्या कामगिरी बद्दल अभिनंदनाचा ठराव व त्यांची या विभागातून बदली होऊ नये यासाठी पत्रव्यवहार शासनाकडे पाठविण्यात येईल असे सांगितले.

सर्व प्रथम संचालक शरदराव चौधरी यांनी श्रद्धांजली चा ठराव मांडला. जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज,महर्षी अगस्ति ऋषी ,दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व लोकनेते मधुकरराव पिचड यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून श्रद्धांजली



वाहण्यात आली.नंतर अहवाल सालात दिंवगत झालेल्या ज्ञात अज्ञात मान्यवरांना श्रद्धांजली वाहण्यात आली. अध्यक्षीय सूचना संचालक आनंदराव वाकचौरे यांनी मांडली त्यास अनुमोदन संचालक अरुण गायकर यांनी दिले.

त्यानंतर अहवाल सालात दूध संघाला जास्तीत जास्त दूध पुरविणाऱ्या दूध उत्पादक शेतकरी व सहकारी संस्था यांचा सत्कार करण्यात आला. संचालक आप्पासाहेब आवारी यांनी प्रास्ताविक करताना दूध संघाच्या गेल्या ५० वर्षाच्या प्रगतीचा व झालेल्या स्थित्यंतरे, आलेल्या अडचणी, व त्यावर मात करून केलेल्या प्रगतीचा अहवाल सादर केला. सभासद सयाजी पोखरकर ,गणेश पापळ, सुनील वाळुंज यांनी संघाच्या पोटनियम दुरुस्ती मधील शब्दरचने आवश्यक असलेले बदलाविषयी सूचना केली तर संघाच्या प्रगती बद्दल मारुती लांडे, गोकुळ आरोटे, लक्ष्मण वैद्य,भाऊसाहेब वाकचौरे यांनी चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक मंडळाचे अभिनंदन केले. विषय पत्रिकेतील सर्व विषय मंजुरीस सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सर्व उपस्थितितांचे स्वागत कार्यकारी संचालक दादाभाऊ सावंत यांनी केले. तर आभार संचालक अरुण गायकर यांनी मानले .

# आई तुळजाभवानीची पालखी सीमोल्लंघनासाठी सज्ज

## २७ सप्टेंबरला राहुरी शहरात भव्य मिरवणूक व तुळजापूरकडे प्रस्थान



**राहु (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आई तुळजाभवानीच्या पालखी सोहळ्याची तयारी राहुरी शहरात पूर्ण झाली असून, पालखी सीमोल्लंघनासाठी सज्ज झाली आहे. सालाबादप्रमाणे बु-हाणनगर येथील भगत परिवाराच्या मानकरी परंपरेनुसार पालखीची बांधणी पूर्ण करण्यात आली असून, शनिवार दि. १९ सप्टेंबर रोजी दुर्गाष्टमीच्या मुहूर्तावर जंगम गल्ली येथील तुळजाभवानी मंदिरात ही पालखी भाविकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आली आहे.

श्रावणी पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी बु-हाणनगर येथून पालखीचा दांडा राहुरी येथे आणण्यात येतो. त्यानंतर राहुरीतील सुतार, लोहार तसेच अन्य कारागीर पालखीच्या बांधणीचे काम सुरू करतात. पारंपरिक पद्धतीने आवश्यक दुरुस्ती, सजावट व रंगकाम पूर्ण करून पालखीला आकर्षक स्वरूप देण्यात येते. यंदाही भगत परिवार व स्थानिक कारागिरांनी परंपरेनुसार पालखीची संपूर्ण बांधणी पूर्ण केली आहे. रविवार दि. २७ सप्टेंबर रोजी राहुरी शहरातून आई तुळजाभवानीच्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. विविध धार्मिक विधी व भक्तिमय वातावरणात पालखीची मिरवणूक झाल्यानंतर ती तुळजापूर येथील सीमोल्लंघन सोहळ्यासाठी प्रस्थान करणार आहे. या सोहळ्याला राहुरीसह परिसरातील मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

# आत्मा गणेशोत्सवातून डॉक्टर्सनी जपली सामाजिक बांधिलकी!

## आध्यात्मिक भक्तीसोबत आरोग्य, व्यसनमुक्ती, पर्यावरण आणि समाजप्रबोधनाचा संदेश!

**अकोले (समर्थ गांवकरी)**



अकोले तालुका मेडिकल असोसिएशन गणेशोत्सव समितीच्या वतीने यंदाचा 'आत्मा गणेशोत्सव' केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक बांधिलकी, आरोग्यसेवा, पर्यावरण संवर्धन आणि समाजप्रबोधनाचा संदेश देणारा ठरला. विभागनिहाय आरतीचे सुंदर नियोजन करून भक्तिमय वातावरण निर्माण करण्यात आले. तसेच हेरंब कुलकर्णी सर व प्रतिमा कुलकर्णी यांच्या माध्यमातून व्यसनमुक्ती विषयावर प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

डॉक्टरांच्या समाजसेवेतील योगदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी माजी सिव्हिल सर्जन डॉ. सतीश महाजन यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. गणेश मंडळाचे कार्यकर्ते, पत्रकार बांधव तसेच नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. अभिनव शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना जीवनरक्षक प्रणालीचे प्रात्यक्षिक दाखवून आपत्कालीन परिस्थितीत प्राथमिक उपचार व जीवनरक्षणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. याशिवाय मंगळागौरीच्या भव्य सोहळ्याचे आयोजन करून पारंपरिक सांस्कृतिक वारसाही जपण्यात आला. गणेशोत्सवाच्या समारोपावेळी आमदार डॉ. किरण लहामटे, डॉ. शामकांत शेटे व डॉ. मेहेत्रे बाळासाहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत बाप्पाची आध्यात्मिक व पर्यावरणपूरक विसर्जन मिरवणूक पार पडली. या संपूर्ण महोत्सवाचे आयोजन आत्मा अध्यक्ष डॉ. संदीपजी कडलग, सेक्रेटरी डॉ. प्रतीकजी घोडके, डॉ. रवींद्र डावरे, डॉ. नितीन चासकर, डॉ. विराज शिंदे, डॉ. निलेश सहाणे, डॉ. संतोष देशमुख, डॉ. सागर कोल्हाळ, डॉ. तुषार गावडे, डॉ. सतीश वाळुंज, डॉ. प्रकाश वाकचौरे, डॉ. प्रमोद कोंढवळे, डॉ. मंजुश्री राहणे, डॉ. नूतन कडलग, डॉ. अनुप्रिता शिंदे, डॉ. दीपाली बेलोसे यांच्यासह आत्मा कमिटीच्या सर्व सदस्यांनी केले.

# कळवणच्या पश्चिम पट्ट्यात अंधाराचे साम्राज्य; शेतकऱ्यांच्या घरी रात्रीचा अंधार गांगुर्डेंचा महावितरणला रास्ता रोकोचा इशारा!

## गणेशोत्सवातच लाईट गायब, पंप बंद - शेतकरी हवालदिल; महावितरणच्या विरोधात काँग्रेस रस्त्यावर उतरणार

**कनाशी (समर्थ गांवकरी)**

कळवण तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात महावितरणच्या आणि अनधिकृत भारनियमनामुळे शेतकरी पुरता त्रस्त झाला आहे. ऐन गणेशोत्सवात आणि कांदा लागवडीच्या हंगामात वीज गायब होत असल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती आहे. या संतापजनक प्रकाराविरोधात काँग्रेस तालुकाध्यक्ष के. के. गांगुर्डे यांनी आक्रमक भूमिका घेत महावितरणला निवेदन दिला आहे.

महावितरणच्या कळवण उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता यांना दिलेल्या निवेदनात गांगुर्डे यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, तात्काळ भारनियमन थांबवून सुरळीत वीज पुरवठा सुरू करा, अन्यथा जिल्हाध्यक्ष रमेशभाऊ कहांडोळे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसह रास्ता रोको आंदोलन करू.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संपूर्ण राज्यात गणेशोत्सवाचा उत्साह सुरू असताना कळवणमध्ये भारनियमनामुळे गणेश मंडळे, गावातील नागरिक आणि पोलीस पाटलांची प्रचंड गैरसोय होत आहे. दुसरीकडे पावसाने उघडीप दिल्याने शेतातील पिकांना पाण्याची नितांत गरज आहे, काही ठिकाणी कांदा लागवड सुरू झाली असून सुरळीत विजेअभावी तीही खोळंबली आहे. या निवेदनादरम्यान महाविकास आघाडीची एकजूट दिसून आली. यावेळी आदिवासी सेलचे जिल्हाध्यक्ष राम चौरे सरचिटणीस योगेश गायकवाड ओबीसी तालुकाध्यक्ष



> पश्चिम पट्ट्यात जिथे गरज आहे तिथे लवकरच मेंटेनन्सचे काम हाती घेतले जाईल. सध्या कोणतेही लोडशेडिंग नाही, वीज पुरवठा सुरळीत आहे. ज्या भागात मेंटेनन्स बाकी आहे, तिथे तातडीने काम करू. नागरिकांना माझी विनंती आहे की, हिटर, शेगडी यांसारखी जास्त वीज ओढणारी अनधिकृत उपकरणे वापरू नयेत अन्यथा दंडात्मक कारवाई होईल. सर्वांनी वीज बिल भरून सहकार्य करावे.
>
> **-योगेश जगदाळे, उपकार्यकारी अभियंता, महावितरण, कळवण**

बापू भावसार सोशल मीडिया अध्यक्ष नारायण गांगुर्डे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे तालुकाध्यक्ष संतोष देशमुख आदिवासी सेल अध्यक्ष रामा पाटील शिवसेना (उबाठा गट) चे तालुकाध्यक्ष अंबादास जाधव व महिला अध्यक्षा शितल महाजन मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संक्षिप्त

### राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्याच्या दिशेने हालचाली?

मुंबई (समर्थ गांवकरी)

मुंबई : राज्यात पावसाने ओढ दिलेल्या विविध भागांमध्ये दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याची प्रशासकीय प्रक्रिया सुरू झाली आहे. पावसाची तूट असलेल्या भागांमध्ये पहिला दुष्काळ ट्रिगर लागू झाल्यानंतर आता दुसरा ट्रिगर लागू करण्यासाठी आवश्यक तांत्रिक बाबींचे विश्लेषण सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यासाठी पीकस्थिती, जमिनीतील ओलावा, जलाशयांतील पाणीसाठा तसेच उपग्रहाद्वारे मिळणाऱ्या 'एनडीव्हीआय' (वनस्पती हिरवाई निर्देशांक) डेटाचा अभ्यास केला जाणार आहे.

### बोट, हाऊसबोट, क्रूझ परवान्यांना आता 'सेवा हमी कायद्या'चे बंधन

मुंबई (समर्थ गांवकरी)

कोकण किनारपट्टीवरील पर्यटनाला चालना देतानाच स्थानिकांच्या जलपर्यटन व्यवसायातील अडथळे दूर करण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र सागरी मंडळाशी संबंधित विविध सेवांसाठी निश्चित कालमर्यादा लागू केली आहे. मंडळाच्या कार्यालयांत मंजुरीसाठी महिनोन्महिने प्रलंबित राहणाऱ्या अर्जांना आता 'सेवा हमी कायद्या'ची मर्यादा राहणार असून, ११ महत्त्वाच्या सेवांसाठी एक ते १५ दिवसांची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. ठरलेल्या मुदतीत सेवा न मिळाल्यास नागरिकांना अपील करण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

### भारताला दसऱ्याची मोठी भेट! भारत-न्यूझीलंड 'मुक्त व्यापार करार' २० ऑक्टोबरपासून लागू!

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही देशांमधील व्यापारी आणि आर्थिक संबंधांना नवी गती देणारा 'मुक्त व्यापार करार' येत्या २० ऑक्टोबर २०२६ रोजी, म्हणजेच दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर प्रत्यक्ष लागू होणार आहे. या कराराची सर्वात मोठी वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे, भारतातून न्यूझीलंडमध्ये निर्यात होणाऱ्या सर्व प्रकारच्या (१०० टक्के) वस्तूंना तिथे आता कोणत्याही कराशिवाय म्हणजेच पूर्णपणे 'शुल्कमुक्त' प्रवेश मिळणार आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी नवी दिल्लीत सोमवारी ही महत्त्वाची घोषणा केली.

### रायपूरमध्ये ५० हजारांहून अधिक नाण्यांनी सजवलेली गणेशमूर्ती

रायपूर (समर्थ गांवकरी)

गणेशोत्सव म्हटलं की बाप्पाच्या आकर्षक मूर्ती, सुंदर सजावट आणि भक्तांचा उत्साह पाहायला मिळतो. यंदा छत्तीसगडमधील रायपूर येथील एका आगळ्यावेगळ्या गणेशमूर्तीची चर्चा रंगली आहे.

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी घेतली 'हनुमान अंश' चित्रपटाच्या टीमची भेट!

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राजधानी नवी दिल्ली येथे प्रसिद्ध संत नीम करौली बाबा यांच्या जीवनकार्यावर आधारित 'हनुमान अंश' या आगामी चित्रपटाच्या कलाकार आणि निर्मात्यांची विशेष भेट घेतली. सोमवारी (२१ सप्टेंबर) पार पडलेल्या या बैठकीत अमित शाह यांनी चित्रपटाच्या संपूर्ण टीमशी मनमोकळा संवाद साधला आणि या अध्यात्मिक विषयावर चित्रपट बनवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

# ज्ञानज्योती पुरस्काराने प्राचार्य बाळासाहेब खिलारी सन्मानित

## उत्कृष्ट शैक्षणिक कार्याची दखल; सिताराम पाटील खिलारी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

टाकळी ढोकेश्वर (समर्थ गांवकरी)

स्वास्थ्य दर्पण प्रतिष्ठान संचलित शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी धोत्रे बु.श्रश्र यांच्या वतीने आदर्श शैक्षणिक नेतृत्वाचा गौरव करण्यासाठी दिला जाणारा 'ज्ञानज्योती पुरस्कार २०२६' श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथील प्राचार्य श्री. बाळासाहेब नारायण खिलारी यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल प्रदान करण्यात आला.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त श्री. सिताराम पाटील खिलारी (अण्णा) यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी स्वास्थ्यदर्पण प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. प्रशांत शिंदे, सचिव सौ. सोनाली शिंदे, प्राचार्य डॉ. जयदीप पवार, श्री दुर्गादेवी विद्यालयाचे प्राचार्य श्री. आदम शेख, अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे सचिव श्री. अमोल ठाणगे, पारनेर तालुका माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री. भगवान राऊत, तसेच दुर्गादेवी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री. सहादू भोंडवे सर यांच्यासह शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

श्री. बाळासाहेब नारायण खिलारी हे टाकळी ढोकेश्वर येथील रहिवासी असून त्यांनी एम.ए.बी.एड. (हिंदी) हे शिक्षण घेतले आहे. वाचन व गायन हा त्यांचा विशेष छंद आहे. ते १ जानेवारी १९९८ पासून अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगर या संस्थेत कार्यरत आहेत. गेल्या २८ वर्षांपासून त्यांनी इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना हिंदी विषयाचे अध्यापन करून राष्ट्रभाषा हिंदीच्या प्रचार व प्रसारासाठी योगदान दिले आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शैक्षणिक गुणवत्ता वाढ आणि संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले आहेत. १ जानेवारी २०२५ पासून श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे पर्यवेक्षक म्हणून त्यांनी कार्यभार स्वीकारला. त्यानंतर १ जून २०२५ पासून याच विद्यालयाच्या प्राचार्यपदी ते कार्यरत आहेत. दीर्घकाळ केलेले अध्यापनकार्य, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठीची धडपड आणि प्रभावी शैक्षणिक नेतृत्व यांची दखल घेत त्यांना 'ज्ञानज्योती पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आल्याने अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज



संस्थेचे अध्यक्ष मा. रा. ह. दरे साहेब, उपाध्यक्ष मा. डॉ. विवेक भापकर, सचिव मा.ड विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मा. मुकेशदादा मुळे, खजिनदार ड. दिपलक्ष्मी म्हसे मॅडम, माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ विश्वस्त मा. नंदकुमार झावरे पाटील साहेब, माजी सचिव जी. डी. खानदेशे साहेब, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे खजिनदार व ढोकेश्वर विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर वृंद यांच्या वतीने तसेच विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमींकडून प्राचार्य श्री. बाळासाहेब नारायण खिलारी यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# ढोकेश्वर विद्यालय परिसरात रोड रोमियोंचा बंदोबस्त करणार

## सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे

पारनेर (समर्थ गांवकरी)

श्री ढोकेश्वर विद्यालयात गणेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात पारनेर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यालय परिसरात विद्यार्थिनींची छेड काढणाऱ्या रोड रोमियोंचा कठोर बंदोबस्त करण्याची हमी दिली आणि सुरक्षित वातावरण निर्माण करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमात बोलताना सोमनाथ दिवटे म्हणाले, शाळेत येताना व शाळा सुटल्यानंतर विद्यालयाच्या गेट परिसरात पोलीस नियमित गस्त घालतील. विद्यार्थिनींची छेड काढणाऱ्या रोड रोमियोंचा बंदोबस्त करून परिसरात शिस्त व सुरक्षित वातावरण निर्माण केले जाईल.

ते पुढे म्हणाले की, किशोरवयात शिक्षण घेत असताना विद्यार्थिनींनी कोणताही घाईघाईचा निर्णय घेऊ नये. संयम बाळगावा आणि आई-वडिलांचा तसेच कुटुंबाचा विचार करावा. लग्न हे प्रत्येकाच्या आयुष्यात येणारे महत्त्वाचे पर्व आहे. त्यामुळे अल्पवयात घरातून पळून जाण्यासारखा निर्णय घेऊ नये. शिक्षण पूर्ण करून योग्य वयात आणि योग्य निर्णयाने जीवनाची वाटचाल करावी, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला.

याचवेळी विद्यालयात प्रथम सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे व खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष बाबासाहेब खिलारी यांच्या हस्ते गणपती बाप्पाची आरती करण्यात आली. स्वास्थ्य दर्पण प्रतिष्ठान संचालित शांतीनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी, धोत्रे बुद्रुक यांच्या वतीने दिला जाणारा 'ज्ञानज्योती पुरस्कार २०२६' विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांना प्रदान करण्यात



**शाळेत येताना व शाळा सुटल्यानंतर विद्यालयाच्या गेट परिसरात पोलीस नियमित गस्त घालतील. विद्यार्थिनींची छेड काढणाऱ्या रोड रोमियोंचा बंदोबस्त करून परिसरात शिस्त व सुरक्षित वातावरण निर्माण केले जाईल. किशोरवयात घाईघाईचा निर्णय घेऊ नका. शिक्षण पूर्ण करून योग्य वयातच लग्नासारखा महत्त्वाचा निर्णय घ्या.. सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे**

आला. या पुरस्काराबद्दल विद्यालयाच्या सर्व सेवकांच्या वतीने प्राचार्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास गोपनीय शाखेचे पोलीस किरण भापकर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ डिजिटल मीडिया जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड, तालुका उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे, संतोष कोरडे, गणेश जगदाळे, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, प्रकाश इघे, प्रा. अशोक गांगड, प्रा. नितीन ढोकळे, अतुल सैद, ग्रंथपाल संदीप खिलारी तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. गणेशाच्या आरतीचे नियोजन सोनल रोहकले व श्रीरंग धामणे यांनी केले. सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव यांनी तर आभार प्रा. भाऊसाहेब हिंगडे यांनी मानले.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जामखेड पोलिसांची शांतता समितीची बैठक

## मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांचा वापर करण्याच्या सूचना; DJ, डॉल्बीला फाटा देण्याचे आवाहन




जामखेड (समर्थ गांवकरी)

गणेशोत्सव २०२६ च्या अनुषंगाने जामखेड पोलीस स्टेशन येथे शांतता समिती सदस्य, गणेश मंडळांचे अध्यक्ष व पदाधिकारी तसेच बेंजो व डीजे मालक-चालकांची बैठक शनिवारी (दि. १९ सप्टेंबर) सायंकाळी घेण्यात आली. पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत गणेशोत्सव शांततेत, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान गणेश मंडळांनी पारंपरिक वाद्यांचा वापर करावा, तसेच DJ व डॉल्बीचा वापर करू नये, अशा सूचना पोलीस प्रशासनाच्या वतीने देण्यात आल्या. गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि ध्वनीप्रदूषण टाळले जावे, यासाठी सर्व मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.यावेळी गणेश मंडळांना अमली पदार्थविरोधी अभियान आणि जनजागृतीसाठी संदेश देणारे फलकही देण्यात आले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक जनजागृती करण्याचा उपक्रम राबविण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले.या बैठकीस जामखेड शहर व परिसरातील सुमारे ६० ते ७० गणेश मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी, शांतता समितीचे सदस्य तसेच बेंजो व डीजे व्यावसायिक उपस्थित होते. गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन आणि गणेश मंडळांनी समन्वयाने काम करण्याचे यावेळी ठरविण्यात आले.

# सहकार टिकवायचा असेल तर सभासदांची साथ हवी....

## निघोजच्या वार्षिक सभेत वसंतराव कवाद यांचे आवाहन..

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

निघोज परिसर कृषी फलोद्यान व भाजीपाला सहकारी संस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष तथा माजी सरपंच चंद्रकांत लामखडे यांच्या अध्यक्षतेखाली निघोज येथील गांडूळ खत प्रकल्पाच्या इमारतीत उत्साहात पार पडली. यावेळी सभासदांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सहकार टिकवणे ही सामूहिक जबाबदारी

वसंतराव कवाद म्हणाले की, सध्याच्या स्पर्धेच्या युगात सहकारी संस्था चालवणे आणि टिकवणे आव्हानात्मक झाले आहे. दिवंगत बाबासाहेब कवाद यांनी सहकाऱ्यांना एकत्रित करून अनेक सहकारी संस्था उभ्या केल्या. या संस्था आजही कार्यरत आहेत. मात्र, विविध तक्रारी आणि अडचणींमुळे सहकार क्षेत्रावर परिणाम होत आहे. त्यामुळे संस्थांच्या संरक्षणाची जबाबदारी केवळ संचालकांची नसून सर्व सभासदांची आहे. शेतकरी अडचणीत असताना त्यांना उधारीवर खत-बियाणे दिल्यास, शेतकरी परिस्थिती सुधारल्यानंतर ती उधारी फेडतो, असे त्यांनी नमूद केले.

पारनेर तालुक्यातील शेतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणारा 'डिंभे-माणिकडोह बोगदा झाला पाहिजे' हा ठराव संस्थेचे संचालक रामदास वरखडे यांनी मांडला. उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या कडकडाटात ठरावाला मंजुरी दिली.

सभेच्या अध्यक्षस्थानी असलेले चंद्रकांत लामखडे यांच्या पारदर्शक आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचे तसेच शेतकऱ्यांप्रती असलेल्या निष्ठेचे उपस्थित वक्त्यांनी कौतुक केले.

यावेळी जी. एस. महानगर बँकेचे व्हाईस चेअरमन भास्करराव कवाद, संस्थेच्या




व्हाईस चेअरमन अमृता रसाळ, संचालक दामू लंके, बाबासाहेब कवाद निघोज पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन नामदेवराव थोरात, ड. बाळासाहेब लामखडे, पत्रकार सुरेश खोसे पाटील, संस्थेचे संचालक, सहकारी पदाधिकारी आणि सभासद उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार संचालक रामदास लामखडे यांनी केले.

# महाविद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती सत्र

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर येथील वैद्यकीय-शल्य परिचर्या विभाग व महिला तक्रार निवारण कक्ष (थोशप उशश्रश्र) यांच्या वतीने, बी.पी.एच.ई. सोसायटीचे अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने तसेच महाराष्ट्र सायबर व क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.




या सत्रास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते.

ऐमन अत्तर यांनी आधुनिक आर्थिक फसवणूक, लक्ष्यित फसवणूक, प्रवेश व नोकरीच्या नावाखाली होणारी फसवणूक, उपकरणांची सुरक्षितता, संकेतशब्द आणि सायबर कायद्याचे वास्तव याबाबत मार्गदर्शन केले. समृद्धी घोरपडे यांनी वास्तविक व आभासी अर्थव्यवस्था, कर्ज ॲप्समधील फसवणूक तसेच सामाजिक माध्यमांवरील धोके व सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर मार्गदर्शन केले.


## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

क्र.कावि/फौजदारी / वारस नोंद/२१/२०२६ अकोले दि. ०३/०९/२०२६

श्रीम. रुपाली संजय देशमुख, रा. सुगाव बु, ता.अकोले, जि.अहिल्यानगर यांचे पती कै. संजय दौलतराव देशमुख हे दि. २५/०३/२०२६ रोजी सोनांबेकर हॉस्पिटल संगमनेर येथे मयत झाले. सदर मयत व्यक्ती हे अहमदनगर डिस्ट्रीक्ट को - ऑपरेटिव्ह बँक अहिल्यानगर शाखा अकोले येथे क्लार्क या पदावर कार्यरत होते. मयत व्यक्तीच्या वारसांना शासनाकडून देय रक्कमा मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केला असुन त्यात खालीलप्रमाणे वारस असल्याचे दर्शविले आहे.

| अक्र. | वारसाचे नाव | वय वर्ष | नाते |
|---|---|---|---|
| १ | रुपाली संजय देशमुख | ३६ | पत्नी |
| २ | पृथ्वीराज संजय देशमुख | १८ | मुलगा |
| ३ | कमल दौलत देशमुख | ८० | आई |

या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील वारस प्रमाणपत्र बाबतचे कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह लेखी स्वरुपात या जाहीर प्रकटनाच्या तारखेपासून ७ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधितांस वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**



**अनुसया(अजित) नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित पुणे मुख्य कार्यालय: हाडको रोड,सासवड ता.पुरंदर जि.पुणे**

**नमुना झेड (नियम १०७ पोट नियम ११ ड(१)**

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्याअर्थी विशेष वसुली व विक्री अधिकारी पुणे व्दारा अनुसया(अजित) नागरी सहकारी पतसंस्था मर्या.पुणे मुख्य कार्यालय हाडको रोड सासवड ता.पुरंदर जि.पुणे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये खाली नमूद केलेल्या ऋणकोस नमूद दिनांकास नमूद केलेल्या रक्कमेची मागणी नोटीस व जप्ती नोटीस पाठवलेली आहे.सदर नोटीशीव्दारे कर्जदार, सहकर्जदार, जामीनदार व नागरीकांना खाली निर्दिष्ठ केलेल्या मालमत्तेचा विशेष वसुली व विक्री अधिकारी पुणे व्दारा अनुसया(अजित) नागरी सहकारी पतसंस्था मर्या.पुणे मुख्य कार्यालय हाडको रोड सासवड ता.पुरंदर जि.पुणे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ पोट नियम ११ ड (१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार नमूद केलेल्या दिनांकास ताबा घेतला आहे.ऋणको व सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की,खाली नमूद केलेल्या मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये.आणि केल्यास अनुसया(अजित) नागरी सहकारी पतसंस्था मर्या.पुणे मुख्य कार्यालय हाडको रोड सासवड ता.पुरंदर जि.पुणे यांचे सर्व प्रकारच्या देण्यास आधिन राहावे लागेल.

| अ. क्र. | थकीत कर्जदार, सहकर्जदार व जामीनदारांची नावे व पत्ता | वसुली दाखल्याची वसुलपात्र रक्कम रूपये व मागणी नोटीस जप्ती नोटीस व स्थावर मिळकतीचा ताबा नोटीस दिनांक | बोजाची रक्कम (येणेबाकी) दिनांक १९/०९/२०२६ अखेर | ताबा घेतलेल्या स्थावर मिळकतीचा तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार सौ. आंबिलढगे सुनिता काकासाहेब रा.१०१ जनवाडी जनता वसाहत मंजु मित्र मंडळ जवळ गोखले नगर पुणे सहकर्जदार श्री.मंजुळकर विजय शंकर रा.स नं १ घर नं ८ सावकार चाळ लक्ष्मी मंदिरामागे पाषाण पुणे श्री.वाल्हेकर मुकेश सुरेश सौ.वाल्हेकर कडुबाई दाविद दोघेही रा.मु.पो.चापडगांव ता.शेवगांव जि.अहमदनगर जामिनदार श्री.धोत्रे राजेश सुरेश रा.स नं १४६ विठ्ठल नगर सुतारवाडी रोड कॉसमॉस बँक जवळ पाषाण पुणे श्री.जाधव टोपु गंगाराम रा.बबन काटे चाळ काटे वस्ती पिंपळे सौदागर पुणे श्री.खोपडे प्रकाश बाळासो रा.मु.पो.नाझरे ता.भोर जि.पुणे सौ.जाधव अनिता अरविंद रा.१०१ जनवाडी जनता वसाहत मंजु मित्र मंडळ जवळ गोखले नगर पुणे श्री.कांबळे सागर बजरंग रा.ए ४४/१८ बिबवेवाडी पुष्पम गॅस समोर बिबवेवाडी पुणे | रू.१४,६६,२४८/- अधिक दिनांक १६/०४/२०२१ पासुन पुढे व्याज<br>मागणी नोटीस दिनांक ०२/०६/२०२६<br>जप्ती नोटीस दिनांक.११/०७/२०२६<br>स्थावर मिळकतीचा ताबा नोटीस दि.२१/०९/२०२६ | १६,१३,८६६/- | कर्जदार सौ. आंबिलढगे सुनिता काकासाहेब यांची मालकी हक्काची मौजे चापडगाव ता.शेवगाव जि.अहमदनगर येथील गट नं.२७५ मधील एकूण क्षेत्र ०६ हे.७७ आर अधिक पोटखराबा ०४ आर असे एकूण क्षेत्र ०६ हे.८१ आर पैकी ३९ आर जमीन मिळकत व सहकर्जदार श्री.वाल्हेकर मुकेश सुरेश यांची मालकी हक्काची मौजे चापडगाव ता.शेवगाव जि.अहमदनगर येथील गट नं.२७५ मधील एकूण क्षेत्र ०६ हे.७७ आर अधिक पोटखराबा ०४ आर असे एकूण क्षेत्र ०६ हे.८१ आर पैकी ५९ आर जमीन मिळकत व सहकर्जदार सौ.वाल्हेकर कडुबाई दाविद यांची मालकी हक्काची मौजे चापडगाव ता.शेवगाव जि.अहमदनगर येथील गट नं.२७५ मधील एकूण क्षेत्र ०६ हे.७७ आर अधिक पोटखराबा ०४ आर असे एकूण क्षेत्र ०६ हे.८१ आर पैकी ६० आर जमीन मिळकत.असे एकुण क्षेत्र ०१ हे.५८ आर ही शेतजमीन मिळकत. |

उक्त निर्दिष्ट स्थावर मालमत्तेची प्रतीकात्मक ताबा नोटीस माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

स्थळ : सासवड

दिनांक : २१/०९/२०२६

सही/-

विशेष वसुली व विक्री अधिकारी

द्वारा अनुसुया (अजित) नागरी सहकारी पतसंस्था मर्या. पुणे

मुख्य कार्यालय : हाडको रोड, सासवड. ता. पुरंदर, जि. पुणे

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## डोंगरगावचे प्रगतशील शेतकरी नामदेव पानसरे यांचा डाळिंब उत्पादनात प्रथम क्रमांक



अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील डोंगरगाव येथील प्रगतशील शेतकरी तसेच तंटामुक्ती उपाध्यक्ष श्री. नामदेव एकनाथ पानसरे यांनी डाळिंब उत्पादनात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते नामदेव पानसरे यांना सर्वाधिक डाळिंब उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये त्यांना प्रथम क्रमांकाचा सन्मान मिळाला आहे.

पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञान, योग्य नियोजन आणि मेहनतीच्या जोरावर पानसरे यांनी डाळिंबाची दर्जेदार व विक्रमी उत्पादनक्षमता साध्य केली. त्यांच्या या यशामुळे डोंगरगावच्या शेतकऱ्यांसह परिसरातील कृषी क्षेत्रात त्यांचे कौतुक होत आहे.

कठोर परिश्रम, शेतीतील नवनवीन प्रयोग आणि गुणवत्तापूर्ण उत्पादन यामुळे त्यांनी मिळविलेला हा सन्मान इतर शेतकऱ्यांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल श्री. नामदेव एकनाथ पानसरे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी शाहरुख खानची हजेरी

मुंबई (समर्थ गांवकरी)

बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खान मुंबईतील अत्यंत प्रसिद्ध आणि मानाच्या अशा 'लालबागच्या राजा'च्या दर्शनासाठी आपल्या कुटुंबासह पोहोचला. बाप्पाच्या चरणी लीन होत त्याने मनोभावे हात जोडून आशीर्वाद घेतले आणि गणेशोत्सवाच्या उत्साहात उत्साहात सहभाग नोंदवला.



या हाय-प्रोफाइल भेटीदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि सुरक्षेच्या दृष्टीने मंडप परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त व सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. बाप्पाच्या दरबारात किंग खानची झलक पाहण्यासाठी आणि त्याच्या आगमनाची माहिती मिळताच चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. सध्या शाहरुख खानचे लालबागच्या राजाच्या मंडपातील दर्शन घेतानाचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत असून, चाहत्यांकडून त्यावर पसंतीचा वर्षाव केला जात आहे.

## सिंधुदुर्गात ऑनलाइन गेमिंग, मटक्याविरोधात विशेष यंत्रणा, मंत्री नितेश राणे यांची माहिती

मुंबई (समर्थ गांवकरी)

सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑनलाइन गेमिंग, ऑनलाइन मटका आणि जुगाराच्या वाढत्या प्रकारांना आळा घालण्यासाठी विशेष यंत्रणा उभारण्याबाबत गृह विभागाकडून अधिक मनुष्यबळ आणि स्वतंत्र पथक उपलब्ध करून घेण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी सोमवारी दिली. जिल्ह्यातील तरुणांना ऑनलाइन गेमिंगच्या विळख्यापासून दूर ठेवण्यासाठी सायबर सुरक्षेवरील नियंत्रण अधिक मजबूत करण्याबाबत जिल्हा प्रशासन आणि पोलिसांसोबत चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.

ओरोस येथे माध्यमांशी संवाद साधताना राणे म्हणाले की, सिंधुदुर्गातील ऑनलाइन गेमिंग आणि सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या प्रकारांच्या पार्श्वभूमीवर विशेष आढावा घेण्यात आला. पोलिसांच्या कारवाईमुळे मटका आणि जुगाराची अनेक केंद्रे बंद झाली असली तरी ऑनलाइन माध्यमातून सुरू असलेल्या प्रकारांवरही आता लक्ष केंद्रित करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. सिंधुदुर्ग जिल्हा गोव्याच्या सीमेला लागून असल्याने ऑनलाइन मटका आणि गेमिंगसारख्या प्रकारांचा धोका अधिक असल्याचे राणे यांनी नमूद केले. तरुण-तरुणींना अशा चुकीच्या सवयींच्या सापळ्यात अडकण्यापासून रोखण्यासाठी जिल्ह्यासाठी स्वतंत्र यंत्रणा कशी उभारता येईल, तसेच राज्याच्या गृह विभागाकडून जिल्ह्याला अधिक बळ कसे मिळवून देता येईल, याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकाऱ्यांसोबत चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.

ऑनलाइन माध्यमातून घडणाऱ्या गुन्ह्यांचे 'डिटेक्शन' कसे वाढविता येईल आणि हे गुन्हे का व कशा पद्धतीने घडत आहेत, याबाबत पोलीस अधीक्षकांनी बैठकीत माहिती दिली. त्यानुसार पुढील काळात आवश्यक कारवाई करण्यात येणार असल्याचे राणे यांनी स्पष्ट केले. या कामासाठी अतिरिक्त मनुष्यबळ किंवा स्वतंत्र पथकाची आवश्यकता असल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून सिंधुदुर्गला विशेष प्रकरण म्हणून अतिरिक्त पथक उपलब्ध करून देण्याबाबतही विचार करण्यात येत असल्याचे राणे यांनी सांगितले.

# 'पावनखिंड'च्या जिवंत देखाव्यातून नव्या पिढीला इतिहासाची प्रेरणा'

## श्री सिद्धेश्वर तरुण मंडळाचा ऐतिहासिक देखावा; आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते उद्घाटन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

गणेशोत्सवाच्या माध्यमातून केवळ मनोरंजन न करता नव्या पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची, मावळ्यांच्या त्यागाची आणि बलिदानाची ओळख व्हावी, या उद्देशाने तोफखाना येथील श्री सिद्धेश्वर तरुण मंडळ व जंगूभाई तालीम ट्रस्टने यंदा 'पावनखिंड'चा जिवंत देखावा साकारला आहे.

मंडळाचे अध्यक्ष राजूमामा जाधव यांच्या नेतृत्वाखाली आणि उपमहापौर ड. धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या या देखाव्याचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले, उपमहापौर धनंजय जाधव, आदिनाथ जाधव आणि अभिमन्यू जाधव यांनी राजूमामांच्या बरोबरीने सातत्याने काम केले आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून विविध देखावे साकारण्याची मंडळाची एक वेगळी संकल्पना आहे. प्रत्येकाच्या मनात छत्रपती शिवाजी महाराज म्हटले की एक वेगळी भावना निर्माण होते.

त्यांचा जीवनपट आपण शालेय जीवनापासून वाचत आणि ऐकत आलो आहोत. मात्र, त्यांनी स्वराज्य कशा पद्धतीने उभे केले, याचा इतिहास नव्या पिढीने जाणून घेणे गरजेचे आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले संपूर्ण जीवन स्वराज्यासाठी समर्पित केले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांनी स्वतःचे रक्त स्वराज्य आणि धर्मासाठी समर्पित केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनीही त्यांचा वारसा पुढे चालविला. मंदिरांचे जीर्णोद्धार करण्याचे मोठे काम होळकरांनी केले. या महान व्यक्ती कशा घडल्या, त्यांच्या जीवनातील पैलू आपण जाणून घेतले आणि त्यांच्या विचारांनी जगण्याचा प्रयत्न केला, तर आपल्या सर्वांचे जीवन सार्थकी लागेल, असे जगताप यांनी सांगितले.

पावनखिंडीचा हा देखावा अहिल्यानगरसाठी आणि विशेषतः नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल. जिवाजी महाले यांनी स्वराज्यासाठी, भूमीसाठी आणि धर्मासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. अशाच प्रकारे असंख्य मावळे स्वराज्यासाठी प्राण समर्पित करण्यास तयार होते. या देखाव्यात त्यांचा त्याग आणि बलिदान प्रभावीपणे दाखविण्यात आले आहे, असे त्यांनी नमूद केले.

भारतभूमीवर झालेल्या मावळ्यांच्या बलिदानामुळेच आज आपण स्वातंत्र्याने गणेशोत्सवासह विविध उत्सव साजरे करू शकतो. पुढच्या पिढीने आपल्या आई-वडिलांकडून हा इतिहास समजून घेतला पाहिजे. आपल्या पूर्वजांनी केलेला त्याग, संघर्ष आणि स्वराज्याची निर्मिती याची जाणीव नव्या पिढीला झाली पाहिजे, असे आवाहन जगताप यांनी केले.




आपण आपल्या देशाचा इतिहास जाणून घेतला पाहिजे आणि अखंड भारताचे स्वप्न प्रत्येक नागरिकाने उराशी बाळगले पाहिजे. आपल्या महान व्यक्तींच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. प्रत्येक उत्सव साजरा करा; मात्र आपली भगवी ओळख आणि आपल्या इतिहासाचा अभिमान कधीही बाजूला पडता कामा नये, असेही आमदार जगताप म्हणाले.

पावनखिंडीतील ऐतिहासिक प्रसंग, बाजीप्रभू देशपांडे, जिवाजी महाले आणि असंख्य मावळ्यांचे शौर्य व बलिदान या जिवंत देखाव्यातून साकारण्यात आले आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या माध्यमातून इतिहास आणि संस्कृती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा मंडळाचा प्रयत्न असल्याचे दिसून येत आहे.

# एक लाखाची लाच स्वीकारताना पोलिस अंमलदार लाचलुचपतच्या ताब्यात

## अहिल्यानगर पोलिस दलात खळबळ

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

हाफ मर्डर आणि रॉबरीचा गुन्हा दाखल न करता सौम्य स्वरूपाचा मारामारीचा गुन्हा दाखल करून तपासात मदत करण्याच्या मोबदल्यात पाच लाख रुपयांची लाच मागून तडजोडीनंतर एक लाख रुपये स्वीकारणाऱ्या पाथर्डी पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या नाशिक पथकाने सापळा रचून ताब्यात घेतले. विनोद शिवाजी मासाळकर (वय ३७), पोलीस अंमलदार, बकल नंबर २४६७, पाथर्डी पोलीस ठाणे असे ताब्यात घेण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या माहितीनुसार, तक्रारदार यांच्या हॉटेलवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा पाथर्डी गावातून मोटारसायकलवरून जात असताना एका ट्रकचालकाशी वाहनाला कट लागल्याच्या कारणावरून वाद झाला. त्यानंतर दोघांमध्ये मारामारी झाली. या प्रकरणात संबंधित कर्मचाऱ्यावर हाफ मर्डर आणि रॉबरीचा गुन्हा दाखल न करता गुन्ह्याचे स्वरूप सौम्य करून मारामारीचा गुन्हा दाखल करण्यासाठी तसेच लवकर जामीन मिळवून देऊन तपासात मदत करण्यासाठी पोलीस अंमलदार विनोद मासाळकर यांनी पाच लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने १८ सप्टेंबर २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांच्याकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर १९ सप्टेंबर रोजी तक्रारीची पडताळणी करण्यात आली.

# कल्याण लातूर महामार्गाला विरोध करण्यासाठी जुन्नर तालुक्यातून आंदोलन तीव्र

शिवनेरी (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यातुन लातूर-कल्याण जनकल्याण महामार्गामुळे बाधित होणाऱ्या शेतजमिनी, घरे व गावांच्या संरक्षणासाठी बनकरफाटा येथे रविवार दिनांक २० सप्टेंबर रोजी धरणे आंदोलन पाचव्या दिवशी धरणे आंदोलन तीव्र होत आहे .

माजी विधानसभा सदस्य बाळासाहेब दांगट , उपाध्यक्ष भगवान घोलप , कार्याध्यक्ष सुरज वाजगे, सचिव पंकज हांडे , स्वप्निल अहिनवे व धरणे आंदोलन कृती समिती जुन्नर तालुका यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या आंदोलनाला तालुक्यातून , मुंबई व पुणे या ठिकाणाहून पाठिंबा मिळत आहे. शेतकरी संघटना अध्यक्ष सचिन थोरवे , रंजना अहिनवे , महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्ष सोमनाथ पाबळे , शैला जाधव, मीरा काळे ,सुयाशा डुंबरे ,शोभा डुंबरे ,भास्कर डुंबरे व व इतर बाधित शेतकऱ्यांनी भावना व्यक्त केल्या. या क्षेत्रातील २५ गाव व येथील वाड्या वस्त्यातील ग्रामस्थ नियोजनानुसार बनकरफाटा येथे आंदोलनासाठी प्रत्येक दिवस एकत्र येत आहेत .

या परिसरातील ग्रामस्थांनी दररोज रात्री पहाटेपर्यंत हरी भजनाचे तसेच सोड हरी जाऊ दे मला बाजारी तसेच मनमोहन



मुरलीवाला ग... या भजनांच्या गौळणीतून महामार्गाला विरोध या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी प्रयत्न केले .

भजनाच्या प्रत्येक सुरातून आमचा प्रश्न ऐका, आमच्या जमिनी वाचवा अशी ग्रामस्थांच्या मनातील भावना व्यक्त होत होती.

शांततेच्या मार्गाने सुरू असलेल्या या आंदोलनातून शासनाने बाधित ग्रामस्थांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी आंदोलन ग्रामस्थांनी भावना व्यक्त करण्यात आली.

# पांडुरंग विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची १७ वी वार्षिक सभा उत्साहात; ३९ सभासदांची कर्जमाफी

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

पांडुरंग विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्या., श्रीगोंदा (ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) या संस्थेची १७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पोपटराव आनंदराव खेतमाळीस यांच्या अध्यक्षतेखाली शिवबा पॅलेस, मांडवगण रोड येथील संस्थेच्या कार्यालयात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

सभेच्या प्रारंभी सचिव एम. के. शिंदे यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले. त्यानंतर अध्यक्षीय मार्गदर्शन झाले. सभेपुढे आलेले सर्व विषय सभासदांनी सर्वानुमते मंजूर केले. यावेळी संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला तसेच आगामी वर्षासाठी विविध निर्णय घेण्यात आले.

सभेत सन २०२५-२६ अखेरचे ताळेबंद, नफातोटा पत्रक, व्यापारी पत्रके मंजूर करण्यात आली. सन २०२६-२७ चे उत्पन्न-खर्च अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले



असून विविध प्रकारची आवश्यक पत्रके तयार करण्याचे अधिकार संचालक मंडळाला देण्यात आले. तसेच सन २०२४-२५ च्या दोषदुरुस्ती अहवालास मान्यता देण्यात आली, सन २०२५-२६ च्या ऑडिट मेमोचे वाचन करण्यात आले आणि आगामी वर्षासाठी लेखापरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली. थकबाकीदार सभासदांकडील वसुलीबाबतही सविस्तर चर्चा झाली. सभेतील महत्त्वाचा निर्णय म्हणजे कर्जमाफीसाठी पात्र ठरलेल्या ६० सभासदांपैकी ३९ सभासदांची कर्जमाफी करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

यावेळी व्हा. चेअरमन दिलीप हरिभाऊ आळेकर, सचिव एम. के. शिंदे तसेच संचालक मंडळातील पांडुरंग आनंदराव खेतमाळीस, अमित नामदेव खेतमाळीस, चंद्रकांत आनंदराव खेतमाळीस, भागचंद गंगाराम घोडके, कुंडलिक बबन गाडे, रावसाहेब बापूराव खेतमाळीस, अनिता संजय खेतमाळीस, राजेंद्र दशरथ खेडकर, मारुती तात्याबा खेतमाळीस, पोपटराव बाबू मेहेत्रे, सुजाता राजेंद्र खेडकर आणि आजिनाथ काशिनाथ मेहेत्रे यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# टॉपर्स अकॅडेमीत विद्यार्थ्यांना यशाचा मंत्र; NEET-JEE तयारीसाठी प्रा. गणेश शिंदे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

आगामी NEET, JEE आणि MHT-CET या स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून अभ्यासाचे प्रभावी नियोजन करण्याच्या उद्देशाने टॉपर्स अॅकेडमी, काष्टी येथे प्रसिद्ध वक्ते प्रा. गणेश शिंदे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थी आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गिरीश कुकरेजा यांनी केले, तर प्रस्तावना अॅकेडमीचे अध्यक्ष प्रा. गणेश कळसकर यांनी केली. यावेळी त्यांनी अॅकेडमीच्या गेल्या पाच वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या ध्येयातून अनेक विद्यार्थ्यांना वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणाच्या दिशेने मार्गदर्शन केल्याचे सांगितले.

प्रा. गणेश शिंदे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेची भीती न बाळगता सकारात्मक दृष्टिकोन, सातत्यपूर्ण मेहनत, शिस्त आणि वेळेचे योग्य नियोजन या यशाच्या चार महत्त्वाच्या किल्ल्या असल्याचे सांगितले. दररोजचे निश्चित उद्दिष्ट ठरवणे, नियमित सराव व टेस्ट सोडवणे, झालेल्या चुका ओळखून त्यातून शिकणे तसेच मोबाईलसारख्या अनावश्यक गोष्टींपासून दूर राहण्याचा सल्लाही त्यांनी दिला.



अपेक्षेप्रमाणे गुण मिळाले नाहीत तरी निराश न होता नव्या जोमाने प्रयत्न सुरू ठेवावेत, असे आवाहन करताना त्यांनी विद्यार्थ्यांनी आई-वडिलांच्या कष्टांची आणि त्यागाची जाणीव ठेवून ध्येयपूर्तीसाठी प्रामाणिकपणे मेहनत करावी, असा भावनिक संदेश दिला.

यश एका दिवसात मिळत नाही; त्यासाठी दररोज केलेली छोटी-छोटी मेहनत, शिस्त आणि सातत्य महत्त्वाचे असते, असे प्रतिपादन प्रा. शिंदे यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी टॉपर्स अॅकेडमीचे संस्थापक श्री. दिलीप कळसकर (नाना) यांनी उपस्थित मान्यवर, पालक, विद्यार्थी आणि अॅकेडमीच्या सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

# मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांची सफाळे येथे दत्तक बालकाच्या घरी भेट; पोषणासोबत कुटुंबाच्या आर्थिक सक्षमीकरणावर भर

पालघर (समर्थ गांवकरी)

जिल्ह्यातील कुपोषण कमी करण्यासाठी केवळ उपाययोजना न करता प्रत्येक कुपोषित बालकाच्या आरोग्याची प्रत्यक्ष जबाबदारी घेण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषदेच्या प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्याने कुपोषित बालक दत्तक घेण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत तसेच सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी सफाळे येथील ठाणेपाडा अंगणवाडीत दत्तक घेतलेल्या हार्दिक निलेश परेड या बालकाची भेट घेऊन त्याच्या आरोग्य व पोषणस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी अंगणवाडीतील बालकांसह उपस्थितांना मोदक देऊन त्यांचा आनंद द्विगुणित केला.

हार्दिकचे वजन व उंची तपासण्यासोबतच त्याला नियमित पोषण आहार मिळतो का, वेळोवेळी आरोग्य तपासणी केली जाते का आणि जंतनाशक औषध दिले जाते का, याची रानडे यांनी संबंधितांकडून माहिती घेतली. बालकाच्या पोषणात आवश्यक सुधारणा व्हावी यासाठी त्याला अंडी व दूध मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या माध्यमातूनउपलब्ध येणार असून, त्याच्या आरोग्याची प्रगती पाहण्यासाठी दर महिन्याला भेट देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुढील सहा महिन्यांत त्याच्या पोषणस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

बालकाच्या आरोग्याची काळजी घेतानाच त्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सक्षम होणेही महत्त्वाचे असल्याने रानडे यांनी हार्दिकच्या घरी भेट देऊन कुटुंबाकडे असलेली जमीन, भातशेती, पालेभाज्यांची लागवड तसेच उत्पन्नाची साधने याबाबत माहिती घेतली. कुटुंबाच्या परिस्थितीनुसार महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून घरघंटी, शिलाई मशीन, पोल्ट्री शेड, कुक्कुटपालन, पशुपालन यांसारख्या उपजीविकेच्या योजनांचा लाभ देता येईल का, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. कुटुंबाचे उत्पन्न वाढल्यास बालकाच्या पोषणाचीही अधिक चांगल्या पद्धतीने काळजी घेता येईल, या उद्देशाने पात्र योजनांचा लाभ देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यानंतर रानडे यांनी धनश्री पिंटू ठाकरे या कुपोषित बालिकेच्या घरीही भेट देऊन तिच्या आरोग्याची आणि कुटुंबाच्या परिस्थितीची माहिती घेतली. कुपोषित बालकांच्या कुटुंबांना त्यांच्या गरजेनुसार शासकीय योजनांशी जोडून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

हार्दिक आणि धनश्री यांच्यासाठी सुकामेवा आणि इतर पौष्टिक खाऊ त्यांच्या मार्फत देण्यात आला. यावेळी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, जिल्हा कार्यक्रम अधिकारी,,( म बा क ) व्यंकटराव



हुंडेकर, बालविकास प्रकल्प अधिकारी अमोल पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. तनवीर शेख, संबंधित अंगणवाडीच्या मुख्य सेविका व पर्यवेक्षिका, ग्रामपंचायत अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## ॲड.प्रकाश कोठारी यांचे अकस्मात दुःखद निधन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



नंदनवन नगर,बन्धन लॉनमागे, सावेडी येथील रहिवासी ड.प्रकाश देवीचंद कोठारी (वय ७३) यांचे २० सप्टेंबर रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने अकस्मात दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी २१सप्टेबर रोजी दुपारी १.३० वाजता नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या मागे पत्नी, सौरभ ,निखिल ड.प्रतिक ही मुले, नातवंडे, भाऊ डॉ .पारस, भावजया, १ बहीण असा परिवार आहे.ॲड.प्रकाश कोठारी हे हिंद सेवा मंडळाचे संचालक तथा भाई सथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांचे मोठे बंधू तसेच चितळे रोड येथील प्रसिद्ध श्रीकृष्ण किराणा दुकान चे संचालक स्व. डी.आर.कोठारी उर्फ मामाजी हे त्यांचे वडील होते.

## निवृत्त कर्नलची १३.९२ लाखांची फसवणूक

### अहिल्यानगरमधील चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

फ्लॅट खरेदीसाठी बुकिंग करून घेतलेली १३ लाख ९२ हजार ६२५ रुपयांची अग्रीम रक्कम परत न करता फसवणूक केल्याप्रकरणी निवृत्त कर्नलच्या फिर्यादीवरून कॅम्प पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे, बेळगाव आणि अहिल्यानगर येथील आरोपींचा यामध्ये समावेश आहे. हा प्रकार नगर–सोलापूर रोडवरील दरेवाडी परिसरात घडल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी भोम दुबे (वय ६५, रा. सारसनगर) यांनी कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

त्यानुसार सतीश वामन गिरी (रा. लोटस रेसिडेन्सी, संगम प्रेससमोर, कोथरूड, पुणे), दिलीप प्रेमराज चंडक (रा. मिरा मेहल, फर्स्ट क्रॉस रोड, आदर्शनगर, बेळगाव), सुशिल हनुमानदास सारडा (रा. सारडा लेन, अहिल्यानगर) आणि सुयश रविंद्र लुणावत (रा. कस्तुर कुंज, आयसीएस कॉलनी, भोसलेनगर, पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित आरोपींनी एल.एस. व्ही.एस. डेव्हलपर्स या कंपनीच्या माध्यमातून फिर्यादीला फ्लॅट खरेदी करण्याबाबत व्यवहार केला. फ्लॅट खरेदीसाठी फिर्यादीकडून एकूण १३ लाख ९२ हजार ६२५ रुपये अग्रीम रक्कम घेऊन बुकिंग करण्यात आले.

त्यानंतर ठरल्याप्रमाणे सदर रक्कम परत करण्यात आली नाही, असा आरोप फिर्यादीने केला आहे. फ्लॅटच्या व्यवहारासाठी रक्कम स्वीकारल्यानंतर ती परत न करता आरोपींनी फिर्यादीचा विश्वासघात केला आणि स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणात चौघांची भूमिका काय होती, तसेच घेतलेली रक्कम नेमकी कोणत्या कारणासाठी वापरण्यात आली, याबाबत पोलीस तपास करीत आहेत. हा व्यवहार १३ मे २०१३ ते १८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नगर–सोलापूर रोडवरील दरेवाडी परिसरात झाल्याचे पोलिसांच्या नोंदीत नमूद आहे.

## हवामहाल प्रतिकृती बनवून गौराईचे भव्य आगमन



पारनेर (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील श्री अतुल सैद सर यांच्या घरी अलीकडेच एक अनोखी आणि प्रेरणादायी घटना घडली. त्यांच्या निवासस्थानी प्रसिद्ध जयपूरच्या हवामहालची सुंदर प्रतिकृती साकारण्यात आली. या कलात्मक प्रतिकृतीमध्ये पारंपरिक राजस्थानी वास्तुकलेचे दर्शन घडते. लाल दगडाची नक्षीकाम, सूक्ष्म झरोके आणि भव्य रचना यामुळे घराला एक वेगळेच सौंदर्य प्राप्त झाले आहे.

याच पार्श्वभूमीवर गौराईचे आगमन झाले. पारंपरिक पद्धतीने गौराईची सईद परिवाराच्या वतीने पूजा–अर्चा करण्यात आली. घरातील सर्व सदस्य आणि परिसरातील नागरिक या प्रसंगी उपस्थित होते. भक्तिभावाने आरती, भजन–कीर्तन आणि प्रसाद वितरण करण्यात आले. प्रतिकृती आणि गौराईच्या आगमनामुळे वातावरणात भक्ती आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

श्री अतुल सैद सर यांनी या प्रकल्पामागील प्रेरणा आणि परिश्रमाबद्दल सर्वांचे आभार मानले. या घटनेने सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरांचे जतन करण्याचा संदेश दिला आहे.

# माझा शेतकरी जगला तरच बाजार समिती ऊर्जितावस्थेत येईल : खा. निलेश लंके

## कृषी उत्पन्न बाजार समितीची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

पारनेर (समर्थ गांवकरी)

शेतकरी हा कृषी उत्पन्न बाजार समितीचा केंद्रबिंदू आहे. माझा कष्टकरी शेतकरी जगला तरच शेतकऱ्यांची कामधेनू असलेली पारनेर कृषी उत्पन्न बाजार समिती ऊर्जितावस्थेत येईल. त्यामुळे सर्वांनी मतभेद बाजूला ठेवून एकमताने समितीच्या प्रगतीसाठी काम करावे, असे प्रतिपादन खासदार डॉ. निलेश लंके यांनी केले.

पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या २२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर होते. यावेळी अशोक सावंत,माजी सभापती बाबाजी तरटे, किसन सुपेकर, रा. या. औटी, अशोक कटारिया, मारुती रेपाळे, संदीप सालके, पद्मजा पठारे, पारनेर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, योगेश मते, अर्जुन भालेकर, दीपक लंके, भूषण शेलार,डॉ. श्रीकांत पठारे, विजय पवार आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक सभापती गंगाराम बेलकर यांनी केले. तर बाजार समितीचा वार्षिक अहवाल सचिव सुरेश आढाव यांनी सादर केला.

खा. लंके म्हणाले, बाजार समितीचा नावलौकिक वाढविण्याचे श्रेय व्यापारी, संचालक मंडळ, कर्मचारी आणि शेतकरी बांधवांना जाते. शेतकरी हाच आपला केंद्रबिंदू असून त्याच्याशी आपले नाते आहे. समितीला पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकविचाराने आणि पारदर्शक पद्धतीने निर्णय घेणे आवश्यक आहे.बाजार समितीच्या प्रगतीचा आढावा घेताना त्यांनी सांगितले की, सन २०२३ मध्ये बाजार समिती तोट्यात होती. मात्र आज समिती सुमारे चार कोटी रुपयांच्या नफ्यात असून ३ कोटी ७२ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. ही बाब अभिमानाची असल्याचे त्यांनी नमूद केले.पूर्वी बाजार समितीत शौचालयासारख्या मूलभूत सुविधाही उपलब्ध नव्हत्या. मात्र विश्वासाने सोपविलेली जबाबदारी संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांनी यशस्वीपणे पार पाडली. कोणत्याही मतभेदाशिवाय एका विचाराने काम केल्यामुळे समिती प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे, असे लंके यांनी सांगितले.

सचिव सुरेश आढाव यांच्या प्रामाणिकपणाचा उल्लेख करताना लंके यांनी ते नियमबाह्य काम करीत नसल्याचे सांगितले. संचालक मंडळ, कर्मचारी आणि सर्वांच्या तत्परतेमुळे समितीची प्रगती झाली असल्याचे त्यांनी नमूद केले.बाजार समितीच्या वतीने आदर्श शेतकरी तसेच विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यासारखे उपक्रम सातत्याने राबवावेत. अशा उपक्रमांतून शेतकरी आणि




विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते, असेही त्यांनी सांगितले. बाजार समितीच्या सुरुवातीपासून पांडुरंग काळे यांचे मोठे योगदान असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

तसेच ज्येष्ठ संचालक मारुती शेठ रेपाळे यांच्यासारख्या अनुभवी व्यक्तींच्या मार्गदर्शनामुळे समितीची नैतिकता आणि पारदर्शकता कायम राहण्यास मदत होत असल्याचे त्यांनी नमूद केले.यापुढील काळातही सर्वांनी एकजुटीने, प्रामाणिकपणे आणि पारदर्शक पद्धतीने काम करून बाजार समितीला आणखी पुढे न्यावे, अशी अपेक्षा खा. लंके यांनी व्यक्त केली.

सूत्रसंचलन मोहन रोकडे यांनी केले तर आभार सुरेश आढाव यांनी मानले.

# श्री. छत्रपती शिवाजी विद्यालयात कवी संमेलन

## विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद

पाथर्डी (समर्थ गांवकरी)

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय, कासार पिंपळगाव याठिकाणी गणेशोत्सवानिमित्त

निमंत्रित कवींचे कवी संमेलन नुकतेच

संपन्न झाले.याकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक पांडुरंग गोसावी हे होते. आपल्या मनोगतात ते म्हणाले की, अशा साहित्य कार्यक्रमातूनच मुलांचा बौद्धिक, सामाजिक व मानसिक विकास घडून येतो. अशा कविसंमेलनाचा विद्यार्थ्यांनी पहिल्यांदाच अनुभव घेतला.यावेळी व्यासपिठावर पर्यवेक्षक बाबासाहेब नवाथे, जेष्ठ शिक्षक विजय भताने हे उपस्थित होते. डॉ.कविवर्य बाळासाहेब कोठुळे, कवी रूपचंद शिदोरे, कवी आत्माराम शेवाळे, कवी महेश लाडणे, प्राचार्य सुनील पानखडे, कवी सचिन चव्हाण यांनी आपल्या बहारदार रचना सादर केल्या.या कवितेस विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक तसेच उपस्थित मान्यवरांनी उत्स्फूर्त दाद दिली. कवी संमेलनाचे अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात सामाजिक जाणिवांचे विचार आणि




विनोदी रचनांनी विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. कवितांच्या माध्यमातून ज्ञान,संस्कार,निसर्ग,शेती, माती, सामाजिक बांधिलकी आणि इतर जीवनमूल्यांचा सुंदर संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला.

गणेशोत्सवाच्या आनंदाला साहित्यिक आणि सांस्कृतिक रंग देणारा हा काव्यमय सोहळा विद्यार्थ्यांसाठी निश्चितच अविस्मरणीय ठरला.या कार्यक्रमाचे प्रास्तविक मराठी विषय विभाग प्रमुख वांढेकर राजेंद्र यांनी तर आभार रमेश मतकर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक– शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी आपले बहुमोल योगदान दिले.

# पावसाळी क्रीडा स्पर्धेत श्री भवानी माता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

पाथर्डी (समर्थ गांवकरी)

पाथर्डी तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धेत अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या श्री भवानी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी मानूर येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

विविध वयोगटांतील धावणे, चालणे आणि लांब उडी प्रकारांत विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत विद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली:

१४ वयोगट (मुले):४०० मीटर धावणे स्पर्धेत दादासाहेब बापू होनमाने आणि २०० मीटर धावणे स्पर्धेत शिवराज आप्पासाहेब शिरसाट यांनी तालुक्यात द्वितीय क्रमांक मि



ळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.

१७ वयोगट: मुलींच्या ३००० मीटर चालणे स्पर्धेत साक्षी नवनाथ हुलगे हिने प्रथम क्रमांक पटकावत जिल्हास्तरावर धडक मारली, तर मुलांच्या १५०० मीटर धावणे स्पर्धेत प्रकाश विलास ढाकणे याने तृतीय क्रमांक पटकावला.

१९ वयोगट: मुलींच्या २०० मीटर धावणे स्पर्धेत दिपाली रोहिदास पालवे हिने द्वितीय क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय निवड निश्चित केली, तसेच तिने लांब उडी स्पर्धेत तृतीय क्रमांकही पटकावला. तर मुलांच्या ३००० मीटर धावणे स्पर्धेत संग्राम बंडू ढाकणे याने तृतीय क्रमांक मिळवला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक श्री. डोळे, श्री. राऊत व श्री. आर. के. शिंदे यांचे विद्यालयाचे प्राचार्य श्री. देविदास सोनटक्के यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# कांद्याच्या रागावर मिळाली मतं, आता कळवणकडे पाठ? खासदार भास्कर भगरे यांच्या कामावर प्रश्नचिन्ह

## काही गावात हजेरी, काही गावात अजूनही प्रतीक्षा; कळवणच्या ग्रामीण भागात – आमचा खासदार कोण? निवडणुकीत घरोघरी, आता फक्त सोयीच्या घरी! कळवणकरांचा सवाल – आमचा खासदार हरवला का?

कनाशी (समर्थ गांवकरी)

दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भास्कर भगरे हे निवडून आल्यानंतर कळवण तालुक्यातील काही मोजक्या गावांनाच त्यांचे दर्शन घडले आहे. तर तालुक्याचा मोठा ग्रामीण आणि आदिवासी पट्टा आजही त्यांच्या प्रतीक्षेतच आहे. त्यामुळे आमचा खासदार कोण आहे? हाच प्रश्न अनेक पाड्यांवर विचारला जात आहे.

लोकसभा निवडणुकीपूर्वी उमेदवार म्हणून भगरे यांनी कळवण तालुक्याला विकासाची मोठमोठी आश्वासने दिली होती. केंद्राच्या कांदा धोरणाविरोधातील शेतकऱ्यांचा रोष त्यांच्या पथ्यावर पडला आणि कळवणच्या जनतेने त्यांना भरभरून मताधिक्य दिले. मात्र वर्ष उलटूनही त्या आश्वासनांची पूर्तता तर दूरच, साधी आस्थेने विचारपूसही झालेली नाही, अशी दबक्या आवाजात चर्चा गावागावात सुरू आहे.

निवडणुकीत रस्ते, पाणी, आदिवासी तरुणांच्या रोजगाराचा आणि शिक्षणाचा प्रश्न सोडवू, असे सांगण्यात आले होते. प्रत्यक्षात आज कळवणच्या अनेक गावांत रस्त्यांची चाळण झाली आहे. जल जीवन योजनेचे तीन–तेरा वाजले असून आजही अनेक गावांत पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना मैलोन्मैल पायपीट करावी लागत आहे. आरोग्य उपकेंद्रात सोनोग्राफीसाठी डॉक्टर नाही, शासकीय आश्रमशाळांची अवस्था बिकट झाली असून सेंट्रल किचनच्या नावाने सगळीकडेच बोंबाबोंब सुरू आहे. या व्यथा मांडायच्या कुणाकडे, असा प्रश्न आता जनतेला पडला आहे.

तालुक्यातील अनेक दुर्गम भागात खासदारांनी अद्याप साधी भेटही दिलेली नाही.

# राज्यात सरसकट दुष्काळ जाहीर करा माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांची मागणी




संगमनेर (समर्थ गांवकरी)

- संगमनेर मार्केट कमिटीचे काम सर्वोत्तम
- बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा व शेतकरी मेळावा संपन्न

राज्यामध्ये अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे पाण्याअभावी पिके जळून चालली आहे. संपूर्ण शेतकरी हवालदिल झाला असून सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहताना पंचनामे यांचा कोणताही फार्स न करता सरसकट दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी काँग्रेस पक्षाचे नेते माजी कृषी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली असून संगमनेर मार्केट कमिटीचे काम सर्वोत्तम असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले आहे.

वडगाव पान येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार येथे विविध विकास कामांचा शुभारंभ शेतकरी मेळावा व वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते.

# लोकमान्य पतसंस्थेची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात!

## आर्थिक शिस्त, सभासदांचा विश्वास आणि पारदर्शक कारभाराच्या जोरावर संस्थेची प्रगती; गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मानाच्या उपक्रमाचे सभासदांकडून कौतुक!

गणोरे (समर्थ गांवकरी)

आढळा परिसरातील गणोरे येथील लोकमान्य ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची २२ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा गणोरे येथील हॉटेल ‘अन्नदाता’ येथे उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. संस्थेचे सभासद, संचालक मंडळ, पदाधिकारी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या सभेत संस्थेच्या मागील वर्षातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तसेच आगामी काळातील संस्थेच्या वाटचालीबाबत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

सभेच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मंगलमय वातावरणात सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली. संस्थेच्या विविध विषयांवर चर्चा करताना सभासदांनी आपली मते व सूचना मांडल्या. अजेंड्यावरील सर्व विषयांवर सविस्तर चर्चा होऊन ते खेळीमेळीच्या वातावरणात मंजूर करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष किसन आंबरे यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेताना सांगितले की, लोकमान्य पतसंस्था ही सहकाराच्या माध्यमातून सभासदांच्या विश्वासावर उभी राहिलेली संस्था आहे. आर्थिक शिस्त, संचालक मंडळ व पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन तसेच सभासदांचा संस्थेवरील विश्वास यामुळे संस्थेची विकासाच्या दिशेने सातत्याने वाटचाल सुरू आहे. आगामी काळात संस्थेला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

गुणवंतांच्या सन्मानाच्या उपक्रमाचे कौतुक:

लोकमान्य पतसंस्थेच्या माध्यमातून पंचक्रोशीतील एमपीएससी, यूपीएससी तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंतांचा सन्मान केला जात आहे. विद्यार्थ्यांना व युवकांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद असल्याचे सभासदांनी यावेळी नमूद केले. अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते आणि त्यांच्या यशाची दखल समाजासमोर घेतली जाते, असे मत सभासदांनी व्यक्त केले. या चांगल्या उपक्रमाबद्दल संस्थेचे अभिनंदन करणारा ठरावही यावेळी मांडण्यात आला.

सभासदांच्या सूचनांवर सकारात्मक चर्चा:

वार्षिक सभेदरम्यान सभासदांनी संस्थेच्या कामकाजासंदर्भात विविध मौलिक सूचना मांडल्या. संस्थेचा कारभार अधिक गतिमान, सभासदाभिमुख आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. सभासदांनी उपस्थित केलेल्या विविध मुद्द्यांची नोंद घेऊन संस्थेच्या पुढील वाटचालीत त्यांचा सकारात्मक





विचार केला जाईल, अशी भूमिका पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

यावेळी गोपाल सहकारी दूध संस्थेचे अध्यक्ष अनिल आमरे, अकोले तालुका देखरेख संघाचे कार्यकारी अधिकारी अंबादास दातीर, बादशाह आंबे, सुनील उगले, भाऊसाहेब परबतसर, नारायण उगले, सुनील बापू वाकचौरे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. वक्त्यांनी लोकमान्य पतसंस्थेच्या कार्याचा गौरव करत संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संस्थेला अधिक भक्कम करण्याचे आवाहन:

अध्यक्ष किसन आंबरे यांनी पुढे बोलताना सांगितले की, सहकार क्षेत्रात संस्थेचा विश्वास आणि आर्थिक शिस्त कायम ठेवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. सभासदांच्या हिताला प्राधान्य देत संस्थेची आर्थिक ताकद वाढविण्यासाठी संचालक मंडळ, कर्मचारी आणि सभासद यांनी परस्पर सहकार्याने काम करावे. संस्थेच्या प्रगतीसाठी प्रत्येक सभासदाचा सहभाग महत्त्वाचा असून, भविष्यातही लोकमान्य पतसंस्था अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करूया, असे आवाहन त्यांनी केले.

सभेच्या शेवटी प्रा. पंढरीनाथ चौधरी यांनी उपस्थित मान्यवर, सभासद, संचालक मंडळ व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. उपस्थितांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे वार्षिक सर्वसाधारण सभा यशस्वीपणे पार पडली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९